# माणूस

शनिवार । २४ जून १९७८
७५ पैसे




## पुढील अंकी
## राजकपूरच्या तीस वर्षांच्या
## प्रदीर्घ चित्र कारकीर्दीचा
## आणि खळखळत्या जीवनाचा वेधक आलेख


## माणूस
## बरसात विशेषांक

प्रसिद्धी : १ जुलै : किंमत सव्वा रुपया

विक्रेत्यांनी कृपया त्वरित मागणी नोंदवावी.

साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक नववा

२४ जून १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◘
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये
◘
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
◘
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◘
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◘
दूरध्वनी : ४४३४५९
◘

राजधानी दिल्ली । प्रतिनिधी

# पार्टी ना बनेगी, ना टूटेगी !

अमेरिकेचा महत्त्वपूर्ण दौरा आटोपून, दिल्लीला परतताच पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी पत्रप्रतिनिधींना जी मुलाखत दिली त्या वेळी त्यांना जनता पक्षाच्या आणि विशेषतः पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांच्या भविष्यासंबंधी प्रश्न विचारले जाणे स्वाभाविक होते. कारण मोरारजीभाई बारा दिवस परदेश-दौऱ्यावर असताना, राजनारायण यांनी आपली चंद्रशेखरविरोधी आघाडी अगदी जोरात चालू ठेवली होती. राजनारायण वेषभूषेमुळे आणि आविर्भावामुळे विदूषक वाटत असले तरी या विनोदमूर्तीचा बोलविता धनी चरणसिंग असल्यामुळे राजनारायण यांच्या उद्गारांची जनता पक्षनेत्यांना विदूषकी आविष्कार अशी बोळवण करून चालणार नाही.

गेल्या वर्षीच्या मार्चमधील लोकसभेच्या निवडणुकीत इंदिरा गांधींना पराभूत करण्याची ऐतिहासिक कामगिरी राजनारायण यांनी पार पाडल्यामुळे त्यांच्या व्यक्तित्वाला एकदम वलय प्राप्त झाले. त्यांनी आपल्या या वलयाचा फायदा जनता पक्षाला करून देण्याऐवजी गेल्या वर्षभरात या पक्षाला सर्वांत जास्त हानी कोणी पोहचवली असेल तर ती त्यांनीच. राजनारायण यांचे अनुयायी त्यांना नेताजी म्हणून संबोधत असले तरी स्वतः राजनारायण मात्र स्वतःला रामप्रभूंचे हनुमान म्हणवून घेतात. या 'हनुमाना'चे रामप्रभू वारंवार बदलत असतात, ही गोष्ट वेगळी. सध्या त्यांनी चौधरी चरणसिंग यांना आपले रामप्रभू मानले आहे. त्यामुळे या हनुमानाच्या शाब्दिक उड्डाणांमागे चौधरीसाहेबांची प्रेरणा उभी आहे हे सगळ्यांनाच ठाऊक आहे. राजनारायण यांच्यासारख्या उपद्रवमूल्य असलेल्या व्यक्ती दुखावल्या जाऊ नयेत अशी काळजी सर्वसाधारणतः घेतली जाते. त्यामुळे ही माणसे शांत होण्याऐवजी अधिकच चेकाळतात. म्हणून त्यांच्या कारवायांनी जे काही नुकसान होणार असेल ते सहन करण्याची तयारी दाखवून त्यांना चापायचे धैर्य काही वेळा दाखवावे लागते. मोरारजीभाईंपाशी हा फटकळपणा भरपूर आहे. म्हणूनच राजनारायण त्यांना वचकून असतात. मोरारजीभाई विमानातून उतरताच राजनारायण पुढे झाले आणि खास कनौजी अत्तर त्यांच्या हाताला लावले. भोवताली बरेच लोक आहेत हे पाहून मोरारजीभाई या स्वागताबद्दल आभार मानून स्वस्थ बसतील अशी राजनारायण यांची कल्पना होती. परंतु मोरारजीभाईंनी त्यांना तेथेच सुनावले, 'यहाँ तो आप मुझे अत्तरकी खुशबू सूंघा रहे है; लेकिन मेरी गैरहजेरीमें आपकी कर्तूतोंकी बदबू आती थी.'

मोरारजीभाईंनी अशी सर्वांसमक्ष हजेरी घ्यावी असेच सध्या राजनारायण यांचे चाळे चालू आहेत. चंद्रशेखर यांनी अध्यक्षपदाचा

मलपृष्ठ १ वर

## पत्रकारांचा मेळावा, नाशिक

# लोकमान्य, आम्हाला माफ करा हो !

निशिकांत भालेराव, औरंगाबाद

कामगारवर्ग हा क्रांतीच्या लढ्याचा अग्रदूत का असू शकतो ? ह्याची कारणमीमांसा करताना मार्क्सने असे म्हणलेय की, ' त्यांच्याजवळ हरण्यासाठी काहीच नसते ! ' ह्याच धर्तीवर पुढे घोषवाक्य निघाले, कामगारांनो, एक व्हा ! You have nothing to loose but your chains !

अगदी याच धर्तीवर आणीबाणीच्या काळात तमाम पत्रकारांना वृत्तपत्रस्वातंत्र्यासाठी एकत्र येण्याचे कोणी आवाहन केले असते तर ? You have nothing to loose but your pens ! परंतु कितीजण तयार झाले असते आपली लेखणी सोडायला ? गेल्या २ वर्षांतील पत्रकारितेचा इतिहास पाहिला म्हणजे तमाम पत्रकारांनी आपल्या घरातील टिळक–आगरकरांचे फोटो उतरवून ठेवले पाहिजेत असे नेहमी वाटते.

आणीबाणीच्या काळात मराठी पत्रकारितेचे स्वातंत्र्यलढ्यात किती contribution होते ? ' साधना, माणूस आणि मराठवाडा ' ह्या तिघांची नावे डोळ्यांसमोर यावीत हेंच खरे contribution ! एरव्ही तद्दन बाजारू पत्रकारिता करणाऱ्या डिंभोणकरांसारख्यांनी आणीबाणी संपल्यावर भाव खाऊन जावा हा स्वातंत्र्यलढ्यानंतरचा दुसरा महत्त्वाचा टप्पा.

या पार्श्वभूमीवर आणीबाणीच्या महिन्यातच ( म्हणजे जून ) अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाचे रौप्यमहोत्सवी अधिवेशन नाशिकला भरणार असल्याची बातमी वाचनात आली. मराठी पत्रकार ' अखिल भारतीय ' पातळीवर गेल्याचे पाहून जरा बरे वाटले. अर्थात हे ' अखिलत्व ' दिल्लीच्या देवधर–नाईक–तपस्वी–गोखले ह्यांच्यापुरतेच मर्यादित आहे हे अधिवेशन सुरू होईपर्यंत उमगले नव्हते. खरे म्हणजे वृत्तपत्रविद्येचा अनुभवी विद्यार्थी म्हणून तरी जाणे भागच होते. शिवाय बसभाड्यात सूट वगैरे जाहीर झालीच होती. माझ्यातला फुकटेपणा उफाळून येत होता.

अधिवेशनाच्या अगोदरच पत्रकारसंघाचे अध्यक्ष ब्रिजलाल पाटील, चिटणीस मोने वगैरे मंडळी मराठवाड्यात निवडणुकीच्या निमित्ताने हिंडत असल्याच्या बातम्या वाचनात आल्या. अध्यक्षपदासाठी मुंबईचे नारायण आठवले, ( पक्षी–अनिरुद्ध पुनर्वसु ) कोगजे व चिटणीसपदासाठी मोने वगैरेंची लढत असल्याचे समजले होते. परिषदेच्या निवडणुकांची पद्धती पाहून जरा गम्मतच वाटली. जो कार्याध्यक्ष तो पुढील वर्षी अध्यक्ष, नूतन अध्यक्ष पुढील वर्षी सत्ता हाती घेणार अशा प्रचंड भानगडी ! अधिवेशनाच्या आधीच टपाल्द्वारे मतदान होणार ! अधिवेशनात खुल्या पद्धतीने निवडणुका का होऊ नयेत ? अशी शंका मनात आली; परंतु लगेच स्थानिक पत्रकारसंघाच्या ( हा ' संघ ' पुन्हा इथे का आला ? ) सदस्यांनी खुलासा केला की, नंदुरबार येथे घटनादुरुस्तीची विशेष सर्वसाधारण सभा झाली. तीमध्ये प्रामुख्याने दोन दुरुस्त्या करण्यात आल्या. पहिल्या दुरुस्तीने ' मराठी पत्रकार परिषद ' ही अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद झाली. ( शे. का. पक्ष, युक्रांद, शिवसेना ह्यांनी राष्ट्रीय व्यापकता आणण्यासाठी परिषदेचा मार्ग अनुसरायला हरकत नाही. ) दुसऱ्या दुरुस्तीने परिषदेच्या कार्याध्यक्ष व सरचिटणीसपदासाठी होणाऱ्या निवडणुकीत सर्व सदस्यांना मतदानाचा हक्क अधिक सुलभरीत्या प्राप्त करून देणारी ' टपालाद्वारे मतदान ' ही पद्धती अंमलात आली. एकूण निवडणुकपद्धतीचे असे त्रांगडे पाहून ब्रिजलाल पाटील, मोने, रंगा वैद्य ह्यांच्या धावपळीच्या दौऱ्यामुळे त्यांच्याविषयी सहानुभूती वाटायला लागली. म्हणजे हो ! आपले मतदारांना समक्ष भेटलेले बरे !

या सर्व भानगडीत नारायण आठवले ह्यांनी ग्रामीण पत्रकारबंधूंना लिहिलेले पत्र पाहण्यात आले. मला मते का द्यावीत ? यासाठी झकासपैकी स्वतःची जाहिरात आठवल्यांनी करून घेतली होती. मी यंव केले, त्यंव केले. असा व्यवस्थित व त्रयस्थ मनाला पटावा असा biodata त्या पत्रात होता. अर्थात आठवल्यांसारखे परिषदेचे अध्यक्ष होण्यासाठी धडपडतात तेव्हा तमाम परिषदेची credibility (आकाशवाणीप्रमाणे) काय असू शकते ? ह्याचा नुसता अंदाज करणेच मजेशीर आहे. सनसनाटी पत्रकारिता करणाऱ्या आठवल्यांकडून स्वातंत्र्यलढ्याची वगैरे अपेक्षा बाळगणे अर्थातच गैर आहे, पण ते काही असो, आठवल्यांचे अपील मतदारांना भुरळ पाडणार हे तेव्हाच लक्षात आले.

या सर्व पार्श्वभूमीवर अधिवेशनाला जायला निघालो. अधिवेशन नाशिकला असल्यामुळे तर दोन वर्षांपूर्वी नाशिक जेलमध्ये कार्यकर्त्यांना भेटायला जाताना जसा उत्साह होता तसा उत्साह विनाकारण संचारल्यासारखा वाटला. इंदिराजींच्या हुकुमशाहीविरुद्ध लढा दिलेल्या असंख्य नेत्यांचे चेहरे नाशिकजेलच्या काळ्याकभिन्न दगडी भिंतीच्या पलीकडे दिसायला लागले.

### दिनांक ९ जून

नाशिकला निघालो तो रेल्वेने, म्हणजे आमच्याबरोबरचे पत्रकार म्हणत होते की बसचे जेवढ भाडे आहे त्याच्या अर्धे रेल्वेचे आहे. तेव्हा कन्सेशनच्या कटकटी कशाला करता ? शेवटी बसची सवलत नाकारून रेल्वेने निघालो. आपण चक्क ९ रुपयांचा त्याग करतोय ही भावना सुखावून गेली. सकाळी साडेसहाला येणारी रेल्वे चक्क ५ तास उशीरा आली ! दंडवल्यांना चिक्कार

शिव्या घालीत घालीत मनमाड गाठले. बरोबरच्या पत्रकारमित्रांनी स्टेशनवरच्या मुक्कामात स्टेशनमास्तरांकडून चहा तर उकळलाच शिवाय मनमाड-औरंगाबाद ब्रॉडगेजचे काम पुढील महिन्यात सुरू होणार असा 'स्कुप' सुद्धा मिळविला. माझ्याबरोबर असलेला जर्नालिझमचा विद्यार्थी मोरे निमूटपणे 'बातम्यांची उगमस्थाने' म्हणून स्टेशनमास्तरचे नाव टिपून घेत होता.

नाशिकला गेल्यावर जेवण मिळणार नाही तेव्हा मनमाडलाच उरकून घेऊ, ह्या विचाराने खाणावळीच्या शोधात पाय फिरू लागले. आमच्याबरोबरचे एक भाविक पत्रकार मथुरा रेस्टॉरंटमध्ये घुसले. पुरीभाजीच्या बश्या वेटरनी आदळल्या! दरम्यान मनमाडसारख्या गावात त्या लहानशा हॉटेलात चक्क दोन स्त्रिया समोरच्या बाकड्यांवर येऊन बसल्या. त्यांच्या मागून दोन पोरं आणि अजून एक मुलगी येऊन बसली. आल्याआल्या त्या दोन स्त्रियांशी त्यांनी भांडायला सुरुवात केली. प्रथम आलेल्या दोन स्त्रियांची नावे एकूण संभाषणावरून कमल आणि सुमन आहेत हे लक्षात आले. दोन पोरांपैकी एक मुलगा दिसायला अत्यंत स्मार्ट, सुशिक्षित वाटत होता. त्याने कमल आणि सुमनला चक्क बजावले की, 'आजपासून तुम्ही केशरच्या हद्दीत यायचे नाही. तुमचे पैसे वगैरे नंतर तुम्ही मिटवून घ्या!' इतका वेळ शांत बसलेली केशर म्हणाली, 'तुमच्या आदमींना सांगा! एका वेळेस ७–८ जण छेड काढायला आले होते!' हे ऐकल्यावर सर्व प्रकार ध्यानी आला. त्या तीन शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रिया आणि त्यांचा तो सुशिक्षित दलाल सर्वांना पाहून भूकच मरून गेली!

नाशिक स्टेशनवर स्वयंसेवकांची बॅचेस लावून लहान मुले उभी होती. त्यांनी आम्ही पत्रकार आहोत हे कसे ओळखले ह्याचे नवल वाटले. आपण ह्या धंद्यात नवीन नाही तेव्हा सहाजिकच आपली पर्सनॅलिटी वेगळी आहे असा माझा समज त्या लहान पोरांनी चक्क हाणून पाडला. स्पेशल बसची व्यवस्था होती. शहरापासून ७–८ कि. मी. अंतरावरील एच. पी. टी. कॉलेजच्या टी. ए. कुलकर्णीनगराच्या परिसरात पोहचलो.

नावनोंदणीचे संस्कार सुरू झाले. आम्ही पाठविलेले फॉर्म तुम्ही बरोबर का आणले नाहीत? वगैरे शिस्तीचा बडगा जाताच उभारण्यात आला. मोने निवगून आले की काय अशी शंका तेव्हाच आली!--२० रुपये प्रवेशफी देऊन ३ दिवसांचे कुपन्स, बॅच वगैरे घेऊन आम्ही निवासस्थान शोधले. ६ गाद्या असलेली एक प्रशस्त खोली व्यापून टाकली.

कार्यक्रमपत्रिका हातात घेतली व सभागृह गाठले. जवळपास शंभर लोक हजर होते. अर्थात आचारसंहितेविषयी बैठक आहे म्हणल्यावर एवढ्यांची उपस्थितीसुद्धा लक्षणीय होती. संहितेविषयी प्रत्येकजण तेच मुद्दे मांडीत होता. भंगी, सरकारी अधिकारी ह्यांच्यापुढे पत्रकारांनी लाचारी का करावी? हा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात होता. अर्थात दारू प्यावी का नाही हा वादग्रस्त मुद्दा प्रत्येकजण टाळीत नसला तरी पिऊ नये असे स्पष्टपणे सांगत होता. नांदेडच्या प्रजावाणीचे सुधाकर डोईफोडे ह्यांनी बरेच चांगले विवेचन संहितेविषयी केले. मुख्य मुद्दा संहिता करून उपयोग नाही तर ती पाळली जाते का नाही असा आहे. अप्पा पेंडशांनी तर एक किस्सा सांगून कहरच केला. एका परदेशी पत्रकारपरिषदेत एक पत्रकार पिऊन खूप तर्र झाला. ज्यांनी पत्रकारांना बोलाविले त्यांच्या श्रीमतीजींच्याजवळ हे महाशय जाऊन म्हणाले, 'I like your breast! Let me peep into it!' आता असे पत्रकार असल्यावर संहिता कोण पाळणार? आणि तुम्ही–आम्ही कोण त्यांना सांगणार? पेंडश्यांच्या ह्या किश्श्याने संहितेसारख्या गंभीर विषयावरची चर्चा मग प्रत्येकाने हसी घेतली. संहिता पाळण्यासाठी नसतेच, मग चर्चा कशाला?

चहापानाची वेळ झाली. कुपन्स फाडून प्रत्येकजण रांगेत उभे! हळूहळू पत्रकार सामानसुमान घेऊन येत होते. जळगाव, अमरावती, धुळे, रत्नागिरी, परभणी, सेलू, नांदेड, सांगली सर्व भागांतून हळूहळू ग्रामीण वार्ताहर, जिल्हा वृत्तपत्रांचे प्रतिनिधी येण्यास सुरुवात झाली. मुंबई-पुण्याकडचे प्रतिष्ठित पत्रकार आधीच आलेले होते.

महाराष्ट्राचे ऊर्जामंत्री जवाहरलालजी दर्डा ह्यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन होते म्हणून हॉलजवळ गेले कोणी तरी सांगितले. दर्डाजी येणार नाहीत. त्यांना राममनोहर त्रिपाठी ह्यांनी रिप्लेस केले आहे. त्रिपाठीजी तीन दिवस अधिवेशनास हजर राहणार आहेत असे समजले तेव्हा त्यांच्यावर अनेक उद्घाटनांची जबाबदारी टाकली जाणार हे गृहीत धरले होते. पुढे तीन दिवस तेच झाले. उठल्याबसल्या 'त्रिपाठीजी, चलिये!'

प्रदर्शन मात्र माहितीपूर्ण होते. विविध राज्यांमधील वृत्तपत्रांच्या खपाचे आकडे, साक्षरतेचे प्रमाण व प्रमुख वृत्तपत्रे मांडलेली होती. महाराष्ट्राचे दालन स्वतंत्र होते. भृंगा, टिमकी, रणभेरी, भक्त-पुंडलीक ह्या हातभर वृत्तपत्रांपासून महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, सकाळ अशा मोठ्या वृत्तपत्रांचासुद्धा समावेश होता.

आंतरराष्ट्रीय दालनातील जागा बहुतेक रशियन मंडळींनी व्यापून टाकली होती. शिवाय एका खोलीत मार्क्स – लेनिनची स्टॉल विक्री चालूच होती. पत्रकारिता एकूण लाल होतीय हे पाहून मी सुखावलो. एकाने माहिती दिली, 'अहो! इथे लालभाईंचे वर्चस्व आहे. माईकवरून घोषणा करतानासुद्धा 'कॉमरेड अमुकतमुक ह्यांनी ताबडतोब यावे' असे सांगितले जाते आणि सुरुवातीला अमेरिकन वृत्तपत्रे लावण्यात ह्या मंडळींनी आक्षेप घेतला होता.' खरेखोटे काही असो रशियन वृत्तपत्रांना अवास्तव महत्त्व व जागा दिली गेली होती, हे खरे! 'प्रावदा' ह्या दैनिकाचा खप १ कोटी १० लाख आहे एकूण ८ हजार दैनिके रशियात निघतात व एकूण सर्वांचा खप १७ कोटी आहे. इझ्वेस्तिया या दैनिकाचा खप ८० लाख. २ हजार वाचकांची पत्रे प्रावदाला येत असतात. चक्रावून टाकणारे हे आकडे पाहिले की आपली वृत्तपत्रसृष्टी अजून किती मागे आहे याची जाणीव होते; पण रशियात एवढी प्रगती आहे ह्यात विशेष काय? सगळा एकतर्फी मामला आहे, असे मनात येताच एकाने हातात पत्रक ठेवले. त्यातील मजकूर पुढीलप्रमाणे 'सोविएत वृत्तपत्रांवर जबरदस्त बंधने असतात काय? होय!! कोणत्याही प्रकारे वंशभेदाचा आणि वंशद्वेषाचा प्रचार करण्यास सोविएत वृत्तपत्रांना बंदी आहे. युद्धज्वर फैलावण्यास, राष्ट्राराष्ट्रातील विद्वेष वाढ-

पृष्ठ २१ वर

# अणुधोरण

## नेहरू ते मोरारजी व पुढे

वा. दा. रानडे

तारापूर अणुकेंद्रासाठी अमेरिकेने रोखून ठेवलेला ७.६ टन अणुइंधनाचा पुरवठा सुरू करण्याचे मान्य केले ही पंतप्रधान मोरारजीभाई देसाईंच्या अमेरिकाभेटीची मर्यादित फलश्रुती. अणुइंधनाचा प्रश्न त्यामुळे तात्पुरता सुटला असला तरी काळजी दूर झालेली नाही. यासंबंधात भारत व अमेरिका यांच्यात झालेल्या कराराची मुदत १९९३ मध्ये संपते. तोपर्यंत वास्तविक अमेरिकेने पुरवठा चालू ठेवायला हवा; पण अण्वस्त्र-प्रसारबंदी करारावर सही करण्यासाठी भारतावर दडपण आणण्याकरिता हा करार अमेरिका रद्द करण्याचा संभव आहे. तो प्रत्यक्ष रद्द झाला नाही तरी अणुइंधनाचा हप्ता मिळविताना प्रत्येक वेळी भारतावर ती टांगती तलवार राहणार आहे. करार केव्हाही रद्द होण्याची शक्यता गृहीत धरूनच अणुइंधनाची मर्यादी व्यवस्था करण्याच्या मार्गाला भारताने लागायला हवे. अमेरिकेने इंधनपुरवठा थांबविला तरी तारापूरकेंद्र आम्ही बंद पडू देणार नाही. थोडा वेळ लागेल पण मर्यादी व्यवस्था आम्ही करू असे मोरारजीभाईंनी अमेरिकेत सांगितले आणि अण्वस्त्रप्रसारबंदी करारावर भारत कोणत्याही दडपणाखाली सही करणार नाही असा निर्धार व्यक्त केला. या बाणेदार भूमिकेचे देश स्वागतच करील, पण ही भूमिका टिकविण्यासाठी केवढी मोठी आव्हाने आपणास स्वीकारावी लागणार आहेत, त्याची आपणास कल्पना आहे काय व ती पेलण्यासाठी आवश्यक ती तयारी आपण करीत आहोत काय हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. भारताने १९७४ मध्ये पहिला अणुस्फोट केला त्या वेळी लिहिलेल्या 'अणुस्फोटाने दिलेले आव्हान' या लेखात (माणूस, १ जून १९७४) या लेखात मी या आव्हानाकडे लक्ष वेधले होते, पण गेल्या चार वर्षांत आपण या बाबतीत काय केले? काही केले असते तर तारापूरसारखा पेच उभा राहिला नसता.

अणुशक्तीच्या शांततापूर्ण उपयोगासाठीच १९७४ चा स्फोट आम्ही केला असे भारताने कितीही सांगितले तरी बड्या राष्ट्रांचा त्यावर विश्वास बसला नाही. भारताने असे आणखी चाचणीस्फोट करू नयेत यासाठी त्यांनी दडपण आणण्यास सुरुवात केली. कानडाने मदत बंद केली. तारापूरसाठी लागणारा अणुइंधनपुरवठा अमेरिकेने अडवून धरला. याशिवाय आतापर्यंत गुप्त राखलेली पण नुकतीच जाहीर झालेली एक घटना म्हणजे राणा प्रतापसागर अणुप्रकल्पासाठी रशियाने भारतास २०० टन जड पाणी पुरविण्याचे मान्य केले पण त्याच्या मोबदल्यात आंतरराष्ट्रीय अणुशक्तिमंडळाशी करार करून काही बंधने स्वीकारणे भारतास भाग पाडले. या प्रकल्पातील उत्पादनाचा उपयोग शांततापूर्ण अणुस्फोटासाठी केला जाणार नाही ही अट भारताने त्यात मान्य केली होती. करार नोव्हेंबर १९७७ मध्ये म्हणजे जनता सरकारच्या राजवटीत अस्तित्वात आला असला तरी प्रत्यक्षात तो इंदिरा गांधींच्या काळातच झालेला होता. जनता सरकारने कराराचा पुनर्विचार केला, पण जड पाण्यासाठी रशिया किंवा दुसऱ्या कोणत्या अण्वस्त्रधारी राष्ट्रावर अवलंबून राहण्याशिवाय मार्ग नव्हता. करार रद्द करणे म्हणजे या प्रकल्पासाठी आतापर्यंत केलेला खर्च वाया घालविणे म्हणून जनता सरकारने करार पुढे चालू ठेवण्यास मान्यता दिली, पण इंदिरा गांधींच्या राजवटीतच हा करार झालेला होता ही गोष्ट जनता सरकारने वर्षभर दडवून का ठेवली? अणुशक्तीचा जर आपणास शांततापूर्ण उद्देशांसाठीच उपयोग करावयाचा आहे तर मग त्यासंबंधीचे करारमदार गुप्त ठेवण्याचे काहीच कारण नाही. उलट ते गुप्त ठेवल्याने उद्देशांबद्दल शंकेला मात्र जागा निर्माण होते.

शांततापूर्ण उपयोगांसाठी अणुचाचण्या आम्ही करणार नाही असे पंतप्रधान मोरारजीभाईंनी अमेरिकेत घोषित करून याबाबतीत देशाचे हात का बांधून घेतले? भारताने आपला याबाबतचा अधिकार का सोडावयाचा अशी टीका श्रीमती इंदिरा गांधींनी केली व आपल्या सरकारचेच धोरण बरोबर होते असे सांगितले; पण या टीकेत इंदिरा गांधींचा दुटप्पीपणा दिसून येतो. रशियाकडून जड पाणी मिळविताना आंतरराष्ट्रीय अणुशक्तिमंडळाशी इंदिरा गांधींनी जो करार केला त्यात शांततेसाठी अणुचाचण्या करण्यासाठीसुद्धा राणा प्रताप सागरकेंद्रातील अणुद्रव्यांचा वापर केला जाणार नाही ही अट त्यांनी मान्य केलीच की नाही? मग मोरारजीभाईंवर त्या कोणत्या तोंडाने टीका करू शकतात?

मोरारजीभाईंनीही या प्रश्नावर अमेरिकेत निश्चित काय म्हटले यासंबंधात परस्पर विसंगत बातम्या व खुलासे आढळतात. भारतात परतल्यावर दिल्लीत पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, शांततापूर्ण उपयोगासाठी सुद्धा अणुचाचण्या आम्ही करणार नाही असे आश्वासन अध्यक्ष कार्टर यांना मी दिलेलेच नाही. आम्हाला अशा चाचण्या करण्याची आवश्यकता वाटत नाही एवढेच मी म्हटले. मोरारजीभाईंच्या या खुलाशावरून आवश्यकता वाटली तर सरकार अणुचाचण्या करील असे सूचित होते.

अणुशक्तीबाबत आपली मूलभूत भूमिका काय असायला हवी? पहिला प्रश्न आपण अण्वस्त्रे बनविणार की नाही? अणुशक्तीचा शांततेसाठीच उपयोग करावयाचा, अण्वस्त्रे बनवावयाची नाहीत असे पंडित नेहरूंपासून आपले धोरण आहे. हे धोरण तात्कालिक नसून दीर्घकालीन आहे. पुढच्या सरकारांनाही ते लागू आहे असे पंडितजी मानीत होते. लालबहादुरशास्त्रींनी अधिक व्यवहार्य भूमिका घेतली. अण्वस्त्रे बनवावयाची नाहीत हे धोरण माझ्या कारकीर्दीत चालू राहील पण याबाबतीत भावी सरकारांचे हात मी बांधून घेऊ शकत नाही असे त्यांनी सांगितले. इंदिरा गांधींनीही अण्वस्त्रे बनवावयाची नाहीत हे धोरण पुढे चालू ठेवले; पण नेहरूंच्या पुढे एक पाऊल म्हणजे शांततापूर्ण उपयोगांसाठी अणुचाचण्या करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि १९७४ साली राजस्थानात पोखरान येथे भारताचा पहिला अणुस्फोट केला. अशा चाचण्यांची काही आवश्यकता नाही असे मोरारजीभाईंना वाटते म्हणून त्या करायच्या नाहीत असे त्यांनी ठरविले.

अणुशक्तीच्या विकासासाठी परकीय तंत्रज्ञान सुरुवातीच्या काळात आवश्यक होते ते आपण घेतले. आता या क्षेत्रात पुढचा विकास परकीय तंत्रज्ञानाच्या मदतीशिवाय करण्याइतकी आपली प्रगती झाली आहे. अणुइंधन, जड पाणी यासाठी परदेशांवर अवलंबून आपण योजना आखल्या. तसे करायला नको होते. आजच्या अडचणी त्यातूनच निर्माण झाल्या आहेत. केरळमध्ये थोरियम मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. त्यापासून युरेनियम २३३ बनविण्याऱ्या योजनांना आपण प्राधान्य दिले असते तर आज आलेल्या अडचणी उपस्थित झाल्या नसत्या. □

# शहा आयोग : दोन उदाहरणे

देशात कुठलीही अराजकसदृश परिस्थिती निर्माण झालेली नसताना, केवळ स्वतःची व आपल्या घराण्याची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी इंदिरा गांधींनी २६ जून १९७५ ला आणीबाणी पुकारली, हा शहा आयोगाचा निष्कर्ष आहे. जर निवडणुकीत इंदिरा गांधींचा पराभव झाला नसता तर ही इंदिरा–संजय सत्ता कशा भयानक रीतीने वापरली गेली असती याची कल्पना शहा आयोगासमोर ज्या अनेक साक्षी झाल्या, त्यातून जे पुरावे पुढे आले त्यावरून चांगली येऊ शकते. या दृष्टीने शहा आयोगाचे महत्त्व फार आहे व पुन्हा असे काळे दिवस येऊ नयेत यासाठी या आयोगाचा सर्वसामान्य जनतेत प्रसार होणेही अगत्याचे आहे.

तुटक तुटक पद्धतीने शहा आयोगाचे कामकाज वृत्तपत्रातून जनतेसमोर यापूर्वी आलेलेच आहे. परंतु इंदिरा काँग्रेसतर्फे सुरू झालेल्या शहा आयोगाविरोधी मोहिमेला यशस्वीपणे तोंड द्यायचे तर हा चौकशी अहवाल सलगपणे, सोप्या भाषेत सर्व भाषांतून प्रसिद्ध व्हायला हवा. मराठीत हे काम पुण्याच्या विश्वकर्मा साहित्यालयाने हाती घेतले आहे व लवकरच या प्रकाशनसंस्थेतर्फे शहा आयोगाचे मराठी भाषांतर प्रसिद्ध होत आहे. पुढील मजकूर या आगामी भाषांतरातून घेतलेला आहे. तो वाचल्यावर २० मार्च १९७७ ला 'दुसरा स्वातंत्र्यदिन' का म्हणायचे हे कुणाच्याही लक्षात यायला वास्तविक अडचण पडू नये. त्या दिवशी इंदिराशाही कोसळली नसती तर कुठल्या प्रकारची राजवट या देशावर लादली गेली असती याची कल्पना या वानगीदाखल दिलेल्या उदाहरणांवरून येऊ शकते. शहा आयोगासमोरही देशात जे जे काही या काळात घडले तो सर्व इतिहास आलेला नाहीच; पण जो पुराव्यानिशी इतिहास पुढे आला तोही अंगावर शहारे आणणारा आहे ! हुकुमशाहीच्या अंतरंगाची कल्पना आणून देण्यास तो पुरेसा आहे. अशा राजवटीखाली स्पेन–पोर्तुगाल, फिलिपाइन्स, दक्षिण अमेरिका इत्यादी देशांतील जनता तीस-तीस चाळीस–चाळीस वर्षे कशी भरडून निघाली असेल याची कल्पनाच करवत नाही. केवळ भाग्य म्हणून आपण वाचलो असे म्हणायचे ! कारण इंदिरा गांधींनी निवडणुकाच घेतल्या नसत्या तर ?

......शहा आयोगाचे हेही एक वैशिष्टच आहे. भक्कम पुराव्यानिशी आयोगाने आपले निष्कर्ष काढलेले असले तरी इंदिरा–संजय किंवा शुक्ला–धवन यांच्या केवळ काळ्या प्रतिमा रंगविण्याचा, व्यक्तिद्वेषावर आधारित नकारात्मक दृष्टिकोन आयोगाने स्वीकारलेला नाही. आयोग शेवटी म्हणतो : कोणाला किती शिक्षा होतील हा भाग गौण महत्त्वाचा आहे. "सरकारी कामकाजपद्धतीत व सरकारी अधिकाऱ्यांच्या मनोवृत्तीत किती प्रमाणात सुधारणा होते यावरच आयोगाच्या श्रमांचे सार्थक झाले की नाही हे ठरणार आहे........"

विश्वकर्मा साहित्यालयाच्या व आयोगाच्या मराठी भाषांतरकर्त्यांच्या श्रमांचे सार्थकही शेवटी यावरच ठरणार आहे........

## १ : वृद्ध तरुणांची झुंज

लोकशाही मार्गाने हुकुमशाही देशात आली आणि ९९% हून अधिक लोक घाबरून जाऊन गप्प बसले. प्रत्यक्ष दिल्लीमध्ये मरणप्राय भीतीचे वातावरण होते. कोणाच्या दारावर मध्यरात्री थाप पडेल याचा नेम नव्हता; पण काही थोडे लोक तरी भीतीच्या पलीकडे गेलेले होते. बोथट झालेल्या सरकारच्या नीतिमत्तेला थोडीशी धार लावण्याचा प्रयत्न त्यांनी निर्भयपणे केला. दिल्लीमधल्या अशा आठजणांची गोष्ट वाचण्यासारखी आहे. एकीकडे शासनाचा पाताळयंत्री आणि निर्लज्ज धाक, तर दुसरीकडे प्राणपणाने जपलेल्या मूल्यांसाठी प्रत्यक्ष प्राणांचीही किंमत द्यायला तयार असलेली निष्ठा यांचे हे द्वंद्व आहे.

श्री. भीमसेन साचार हे एक ८२ वर्षांचे तरुण. जुने स्वातंत्र्यसैनिक. एके काळचे आंध्रप्रदेश, ओरिसाचे गव्हर्नर, हिंदुस्थानचे श्रीलंकेमधील राजदूत आणि पंडित नेहरूंचे अनुयायी मित्र. यांनी आपल्या सात मित्रांसह इंदिराजींना एक पत्र पाठविले. उरलेले

सातही जण साठीच्या आसपास होते किंवा साठी ओलांडलेले. कुणी प्राध्यापक, कुणी सर्वोदयी, कुणी सुप्रीम कोर्टाचे वकील, कुणी सेवा-निवृत्त सरकारी अधिकारी, समाजसेवक, अध्यात्ममार्गी; पण सगळे निधडया छातीचे! आणीबाणी २६ जूनला लागली आणि एका महिन्यातच, २३ जुलै ७५ ला त्यांनी पंतप्रधानांना उद्देशून एक पत्र लिहिले. एकीकडे सगळा देश भीतीच्या गर्तेमध्ये खोल खोल जात असताना दुसरीकडे हे आठजण ताठ मानेने इंदिराजींना म्हणत होते, 'आम्ही तुमचे साधे आणि सामान्य देशबांधव आहोत. राजकारण आणि राज्यसत्ता यांच्याशी आम्हाला कर्तव्य नाही. विधायक काम करावे आणि व्यक्तीची प्रतिष्ठा व स्वातंत्र्य यांचा पुरस्कार करावा, याच आमच्या निष्ठा. पंडित जवाहरलाल नेहरू यांना आम्ही भारतीय लोकशाहीचे एक प्रमुख शिल्पकार मानतो. ते जर आता असते तर त्यांनी पूर्वी दिलेल्या 'स्वातंत्र्य धोक्यात आहे. सर्व शक्तीनिशी त्याचे रक्षण करा!' या ब्रिटिशविरोधी घोषणेसारखीच 'लोकशाही संकटात आहे, सर्व शक्तीनिशी तिचे रक्षण करा!' अशी घोषणा दिली असती.

'कायदा न जुमानणाऱ्या, बेइमान लोकांच्या विरुद्ध कारवाई करण्यासाठी काही विशेष अधिकार आपण स्वत:कडे घेतलेत, तर ते समजू शकते;. परंतु जनतेला सर्वसामान्य स्वातंत्र्यसुद्धा द्यायचे नाही, शासनाच्या गुणावगुणांचे परीक्षण करू द्यायचे नाही, संसदेच्या कामकाजावरच प्रसिद्धिपूर्व नियंत्रण घालायचे, तुरुंगात टाकलेल्या राजकीय नेत्यांची नावेसुद्धा जनतेला कळू द्यायची नाहीत, त्यांना बचावाची संधी द्यायची नाही आणि आपल्या शासनपद्धतीला संसदीय लोकशाही म्हणायचे हा गहजब आहे!' हे पत्र खूप मोठे आहे. पंडितजींच्या विचारांचा आणि शब्दांचा समर्पक वापर करून लिहिले आहे. 'भीती हा माणसाचा सर्वांत मोठा शत्रू आहे' हा पंडितजींचा विचार त्यात मांडलेला आहे. त्यांच्याप्रमाणेच भीतीवर मात करण्यासाठी स्वार्थत्यागपूर्वक लढा करण्याची उमेद मनात धरून या पत्राच्या शेवटी हे लोक म्हणतात,-

'सांप्रतचा काळ हे प्रत्येक नागरिकास, विशेषत: आमच्यासारख्या अद्याप जिवंत असलेल्या स्वातंत्र्यसैनिकास एक आव्हान आहे! हे आव्हान आम्ही पत्करणार आहोत. ९ ऑगस्ट १९७५ पासून आम्ही भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य आणि संघटनास्वातंत्र्य हे आमचे मूलभूत हक्क शासनाचे परीक्षण करण्यासाठी मुख्यत: वापरणार आहोत. अधिकाऱ्यांना अडचणीत टाकणे किंवा अकारण खळबळ माजविणे हा हेतू त्यामध्ये नसेल. स्वयंशासनावर आमचा विश्वास आहे. ज्या मातृभूमीच्या शृंखला तोडण्याचे भाग्य आम्हाला मिळाले तिची ही आणखी एक विनम्र सेवा आम्ही करीत आहोत!'

हे लोक निर्भय होते पण भोळसट नव्हते. 'सामाजिक जीवनात मुरलेले एकापेक्षा एक वस्ताद म्हातारे' असेच त्यांचे वर्णन केले पाहिजे. हे पत्र त्यांनी हस्तेपरहस्ते धाडले नाही. त्यांच्यापैकी एकजण श्री. भारद्वाज हे २४ जुलै १९७५ ला स्वत: १ सफदरजंग मार्ग येथे गेले आणि त्या पत्राची त्यांनी पोच घेतली आणि ती आयोगापुढे सादर केली. ते पत्र एम्. एन्. शर्मा या अधिकाऱ्याने स्वीकारले होते. श्री. शर्मा यांनी आयोगापुढे तसे कबूलही केले. एवढयाने भागले नाही. ते पत्र २४ ऐवजी २८ तारखेला मिळाले अशी बतावणी करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. पत्राच्या स्वीकृतीची तारीख संदिग्ध ठेवण्यात इंदिराबाईंसकट सगळे गुंतलेले होते हे स्पष्ट झाले.

ही मंडळी आधी पकडली गेली आणि नंतर पत्र मिळाले असा पुरावा तयार करावा अशी यामागे भूमिका होती. म्हणजेच पंतप्रधानांच्या घरी पत्र पोचल्या पोचल्या त्यांना अटक करण्यात आली अशी भावना निर्माण झाली नसती आणि या प्रकरणी इंदिरा गांधींचा काही हात नाही अशी बतावणी करता आली असती. २४ किंवा २५ जुलै ७५ ला दुपारी २॥ वाजता धवन यांनी दिल्लीचे दंडाधिकारी सुशीलकुमार यांना बोलाविले तेव्हा तेथे डी. आय. जी. भिंदर हेही होते आणि त्यांना असे सांगितले की भीमसेन साचार व अन्य सातजणांना मिसाखाली अटक करण्याची आवश्यकता आहे. त्यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, हा निर्णय तेव्हाच्या पंतप्रधानांनी केलेला होता. निर्णय झालेलाच होता म्हणून सुशीलकुमार हे दिल्लीचे नायब राज्यपाल किशनचंद यांच्याकडे गेले. नायब राज्यपालांनी 'मला धवन यांनी सुद्धा या निर्णयाची माहिती दिलेली आहे' असे सांगितले. सुशीलकुमार यांनी या निर्णयाची माहिती इतर सहाय्यक दंडाधिकाऱ्यांना द्यावी असेही सांगितले म्हणजे पोलिसांकडून साचार इत्यादी आठ जणांच्या स्थानबद्धतेची मागणी येताच तिला त्वरित मान्यता देता यावी अशी संपूर्ण तयारी करण्यात आली.

श्री. किशनचंद यांनी आयोगापुढे अशी कबुली दिली आहे की २५ जुलैला या आठजणांना अटक करण्याचा निर्णय त्यांना धवन यांच्याकडून कळला होता. त्यांची अशी खात्री होती की, हा निर्णय स्वत: पंतप्रधानांचाच असला पाहिजे. कारण संबंधित व्यक्ती खूपच प्रसिद्ध होत्या त्यामुळे यासंबंधी योग्यायोग्यतेचा विचार त्यांनी केला नाही.

प्रत्यक्षात तर पोलिसांकडून आवश्यक कागदपत्र येणाच्या आधीच पकडवॉरंटेही तयार झाली होती. दिल्लीच्या एका सहाय्यक जिल्हा दंडाधिकाऱ्याने आयोगापुढे असेही सांगितले की, दिल्लीमध्ये बऱ्याच वेळा आधी अटक केली जायची व नंतर पोलिसांकडून कागदपत्रे मिळायची. भीमसेन साचार यांच्या स्थानबद्धतेचा आदेश देणाऱ्या श्रीमती मीनाक्षी दत्त घोष यांनीही आपण पोलिसांनी सादर केलेली कागदपत्रे मिळण्यापूर्वीच आदेश दिला व त्या कागदपत्रांकडे डोळेझाक केली असे कबूल केले. बेफिकीरीची ही साथ वरपासून खालपर्यंत होती. धवन यांचा फोन आला की इंदिराजी किंवा संजय यांचीच तशी इच्छा आहे असाच अर्थ काढला जायचा. लवकरात लवकर कुणाला तरी तुरुंगात डांबणे एवढेच काम उरायचे. दिल्लीचे पोलिस व न्यायाधीश मंडळी यांनी हे काम मन लावून केले.

या आठजणांच्या विरुद्ध पोलिसांनी नेमका काय पुरावा गोळा केला? त्यांच्यावर काय आरोप ठेवले? आठांपैकी सात जणांवर त्यांनी ठेवलेले आरोप हे पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रातले विचारच उलटसुलट करून तयार केलेले होते. गुप्तहेरखात्याने दिलेल्या माहितीत काहीच दम नव्हता. त्यामुळे पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्राबद्दलच त्यांना अटक झाली हे उघड आहे. बतावणी मात्र अशी करण्यात आली की प्रथम हे पत्र गुप्तहेरखात्याने पकडले. मग कारवाई झाली आणि त्यानंतर ते पत्र पंतप्रधानांच्या घरी पोहोचले. यथावकाश १९७६ च्या

पृष्ठ १७ वर

## मुक्ताफळे

# डोळे तुम्ही, घ्या रे सुख

परवा आमच्या मित्राला एक पत्र आले. त्याने ते आम्हाला दाखवले. पत्र असे होते.–

माझी मुलगी चि. शीला बी. अे. ऑनर्स फर्स्ट क्लास, अेम्. अे. पार्ट वन् फर्स्ट क्लास. ही लग्नाची आहे. मुलगी देखणी व गोरवर्णाची आहे उंची ५' ४" वजन ११६ सर्व खेळात प्रवीण असून, दोन वेळा टी. व्ही. वर जाऊन आलेली आहे....वगैरे

टी. व्ही. म्हणजे दूरदर्शन. तर दूरदर्शनावरून तिने कोणत्या कार्यक्रमात दर्शकांनी दोनदा दर्शन दिले, याचा खुलासा वधूपित्याने केलेला नसला, तरी टी. व्हीवर दिसणे, हे आता किती महत्त्वाचे झाले आहे, हे आपल्या लक्षात येईल. सर्व खेळात प्रवीण असणाऱ्या मुलींनाही 'प्रेमाचा खेळ' पुष्कळ वेळा जमत नाही. होतं असं त्यांना 'दाखवून घेणे' वगैरेही आवडत नाही. आता मुलगी पाहून लग्न करण्याची सर्वांना सवय लागल्याने, मुलगी दाखविल्याशिवाय पहाता येत नाही! आता बसस्टॉपवर, एस्. टी. स्टॅंडवर, बसमध्ये, गाडीत देखण्या मुली हमखास भेटतात. पहाता येतात; पण सांगून येणाऱ्या मुलीत या बहुधा नसतात! आणि दिसल्याबरोबर तिला तिथल्या तेथे सांगून जाणे तरुण मुलांना जमत नाही!

पण आमचे म्हणणे आता दूरदर्शन झाल्यामुळे मुलींना दाखविण्याचा कार्यक्रमातून सहज मुक्त करता येईल. लग्नाच्या मोसमात, पुणे–मुंबई दूरदर्शनकेंद्रावरून रोज सायंकाळी ६ ते ७ मुली दाखवण्याचा कार्यक्रम केला, तर केवढी बरे सोय होईल? तासात शे–सव्वाशे मुली सहज दाखवून होतील! प्रत्येक मुलीचा ठळक क्रमांक. प्रथम दाखवायचा मुलीचा चेहरा. चेहरा 'मेल्ट' होत असताना लगेच तिची पत्रिका दिसेल. मग थोडक्यात गुणवर्णन व पत्रव्यवहाराचा पत्ता! भर् भर् भर् भर् मुली पाहून होतील! मुलगी मंगळवेढयातून पुण्याला दाखवायला आणायची. एकदा मुलगा पहाणार! पसंत पडली तर पुनः आत्याला दाखवायला आणायची. आत्याला पसंत पडली, तर मग अमेरिकेतून येणाऱ्या काकाला दाखवायला आणायची. प्रत्येक वेळी चहा, शिरा, केळी, बिस्किटे! सगळा जंजाळ खलास! मुलगी आवडली. क्रमांक टिपला. टाकले पत्र! छाया–गीता–यांची होणारी गर्दी काहीच नाही! अशी गर्दी उसळेल टी. व्ही. पुढे. शिवाय समाजकार्य! टी. व्ही. ला भरपूर उत्पन्न आणि दर्शकांची तासभर रटाळ कार्यक्रमातून रोज मुक्तता! दाखवून घ्यायला जरी शिकलेल्या मुली तयार झाल्या नाहीत तरी टी. व्ही. वर जायला त्या मुळीच नकार देणार नाहीत. चि. शीला नाही का दोनदा टी. व्ही. वर जाऊन आल्याचे तिच्या तीर्थरूपांनी आपल्या मित्राला कळविले आहे! तेव्हा दूरदर्शन केंद्राधिकारी, वधूवर सूचक संस्था आणि दर्शक यांच्या परस्पर सहकार्याने हा बहारदार कार्यक्रम त्वरित सुरू करण्यात यावा अशी आमची सूचना आहे.

आता तूर्त दूरदर्शनवर ज्या सुंदर सुंदर चर्चा होतात, तरुणांचे कौतुक होते, त्या कार्यक्रमाला या मुली दाखवण्याच्या कार्यक्रमामुळे थोडा कमी वेळ मिळेल याचे आपल्याही दुःख होते. खरोखर दूरदर्शनवरील, विचारपरिप्लुत कार्यक्रम पहाताना आम्ही जेव्हा 'तुम्हीच विचार करा' या सूचनेनुसार स्वतः विचार करू लागतो, तेव्हा आम्हाला झोप अनावर होते. विचाराचा ताण बरं हा! परवाच आम्ही चर्चा ऐकली. जशीच्या तशी आठवते आहे. तुम्ही नाही ऐकलीत–पाहिलीत? काय छान झाली चर्चा–

प्रथम चर्चेच्या नियंत्रकाने अुपोद्घात केला. अुपोद्घात यातला 'घात' शब्द चांगला नाही पण या कार्यक्रमाच्या संबंधात तो वापरण्याशिवाय गत्यंतर नाही. हा अुपोद्घात–बरं–

साबण! अेक नित्योपयोगी वस्तू. नाही निर्मळ मन! काय करील साबण?' असे संतश्रेष्ठ तुकारामहाराजांनी म्हटलेले आहे; परंतु शरीर जर अमंगल झाले असेल–अस्वच्छ झाले असेल-स्वच्छ राहिलेले नसेल, तर तिथे साबणच काही तरी करू शकतो हा आपला सर्वांचाच अनुभव आहे. जे शरीराचे तेच वस्त्राचे! शरीर घाण होते म्हणून वस्त्र घाण होते, का वस्त्र घाण झाल्याने शरीर घाण होते हा कूट प्रश्न तत्त्वज्ञांनी सोडवायचा आहे. दोन्ही वेळप्रसंगी घाण होतात हा आपला अनुभव आहे. हाताला शाई लागते, रस्त्यातून चालताना तर शरीरावर कावळा अथवा पारवा विष्ठा टाकतो. पावसाळ्यात शेजारून जाणारी मोटार, रस्त्यावरील डबक्यातले पाणी अंगावर उडवून जाते. अशी अेक ना दोन उदाहरणे सांगता येतील. शिवाय माणसाला घाम येतो किंबहुना हा घाम नसता तर कामगारचळवळ उभी झाली नसती. मार्क्सला देखील काही तत्त्वज्ञान सुचले नसते असा हा घाम! घाम का येतो याचे शास्त्रीय उत्तर आमच्या म्हणजे दूरदर्शनाच्या–'शरिराची ओळख' या लोकप्रिय कार्यक्रमात सविस्तर देण्यात आलेले आहे. त्याची मी पुनरावृत्ती करीत नाही. मी अेवढेच म्हणेन की शरीरधर्मानुसार घर्म येतो! शरीर अस्वच्छ होते. साबण आपल्याला लागतो. आता साबण लागतो हे ठरल्यानंतर, कोणता साबण चांगला, तो इतका महाग का, असे अनेक प्रश्न निर्माण होतात. झालेले आहेत, पुढे होतील. तर या प्रश्नांची चर्चा आपल्याला आज करायची आहे. त्यासाठी आपल्याकडे आज तीन व्यक्ती आलेल्या आहेत. (कॅमेरा प्रथमच हलतो.)

माझ्या डावीसे बसलेले आहेत ते साबणाचे उत्पादक झीजाभाई साबणवाला. साबणनिर्मिती ते करतात. त्यांची मातृभाषा गुजराथी असली तरी ते मराठी चांगले बोलतात. ते आपले विचार मांडतील. त्यांच्यापलीकडे (पुन्हा कॅमेरा हलतो) आहेत त्या मिसेस लिरीला राजहंस. अनेक प्रकारचे साबण वापरून, आपली अंगकांती सतेज व

तुकतुकीत झाली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. लहानपणापासून साबण वापरण्याचा त्यांचा सराव आहे. त्या आपल्या या चर्चेत महत्त्वाचा वाटा उचलणार आहेत. तिसरे जे गृहस्थ आहेत ते श्री. नारायण भगवंत तुपे. आडनाव तुपे असले तरी साबण विकतात. साबणाचे विक्रेते आहेत. विविध प्रकारचे साबण ते विकतात. आपल्या विक्रीच्या प्रदीर्घ अनुभवातून ते काही मौलिक विचार मांडतील अशी मला आशा आहे.

तर प्रथम झीजाभाई–तुम्हाला प्रश्न विचारतो.

'मला वाटतं, तुम्ही दोन्ही प्रकारच्या साबणाचे उत्पादन करता. अंगाला लावायचा आणि कपडे धुण्याचा !'

'हो ! अंगाला लावण्याचा व कपडे धुण्याचा असे दोन्ही प्रकारचे साबण आम्ही तयार करतो. तिसरा पण एक साबण असतो. दाढी करायचा; फॅक्टरीमधी तयार करतो. पण आम्ही ते बनवीत नाही !'

'हं, तर हे जे दोन प्रकारचे साबण तुम्ही सांगितलेत त्यात महत्त्वाचा फरक कोणता?'

'दोन्ही साबणामधी फरक असा काय नाही. एकमधी जरा सोडा जास्त असतो अने सेंट बिलकुल नसतो. कपडे धोण्यासाठी हा साबण आम्ही तयार करतो आणि दुसऱ्यामधी सोडा कमी आणि तेल, चांगला वास, पहिले १।२ दिवस तरी येईल अशी आम्ही व्यवस्था करतो.'

'म्हणजे तुमचे म्हणणे दोन्ही साबणांचा मुख्य जो धर्म–मालिन्य घालवणे, निर्मळपणा आणणे तो एकच आहे. फक्त दोघांच्या रचनेत थोडा फरक आहे; पण आपण असा एखादा साबण नाही का तयार करीत की, जो कपड्यांना लावता येईल आणि स्नानाच्या वेळीही वापरता येईल ?'

'अशी पण एक क्वालिटी आमचेपाशी हाय. स्नानासाठी आपण जो साबण यूझ करते तेचा फेस फार येतो. झिजतो पण तो फार. घरी पाहुणे आले तर खर्चा फार होतो. पाहुणेमंडळी आली तर ते लोकानला देण्यासाठी आम्ही एक साबण करतो. ते किती पण अंगाला लावला तरी झिजत नाय. फेस अगदी कमती येणार ! आता हे जो साबण आहे, ते कपडे धोण्यासाठी पण वापरला तरी चालू शकते.'

'आलं लक्षात आता. आपण नेहमी घरात जो साबण वापरतो तो भरपूर फेस येणारा असला, तरी पाहुणे वगैरे आले की, ही तुमची नवी साबणवडी बाथरूममध्ये ठेवली की, मग काळजी नको. वा ! अशा तऱ्हेचा साबण काढून तुम्ही मध्यमवर्गीची खूपच सोय केलेली आहे–लिरीलाबाई, आता यापुढे मला वाटते, तुमच्या अनुभवाचा उपयोग होणार आहे. मला वाटते, तुम्ही आपली अंगकांती साबणाच्या वापराने तजेलदार व तुकतुकीत केली आहे.'

'हो !'

'तर यासाठी तुम्ही एकच साबण वापरता की–'

'नाही. मी वृत्तपत्रांतील जाहिराती नेहमी वाचते. बाकीचा मजकूर मिस्टर वाचतात. ज्या सीझनला ज्या साबणामुळे अंगकांती सतेज होते अशी जाहिरात असते तो साबण मी वापरते !'

'अरे वा ! पण आपण हा जो साबण वापरता तो एका वेळी किती वापरता ? जाहिरातीत दाखवतात तेव्हा लावता का ?'

'ते वेळावर अवलंबून ठेवते. प्रथम मी अंगावर कोमट पाणी घेते. सर्व अंग भिजले की, मग प्रथम गळ्याखाली दोन्ही हातांनी फेस फासते. हात तसेच वर नेऊन तोंडावरून साबण लावते, मग दंडावर, अशा क्रमाने खाली खाली येते.'

'ही पद्धती आपण अनुभवाने ठरवली असणार–'

'अर्थातच. मुख्यतः लोकांना दिसणारे जे शरीराचे भाग आहेत–उदाहरणार्थ, चेहरा, गळ्याखालचा बराच भाग, पाठीवरचा बराच भाग, तो मी साबण वापरून निर्मळ व तुकतुकीत ठेवते !'

'आपण जी ही माहिती सांगितलीत ती आमच्या दर्शकांना खूपच आवडली असणार; पण माझा प्रश्न असा आहे की, एका वेळी जाहिरातीत दाखवतात तसा फेस काढला तर सामान्य माणसाच्या तोंडाला महिनाअखेर फेस येईल–(मोठ्याने हसतो. लिरीलाबाई स्मित करतात. कॅमेरा एकदम अंगावर आल्याने झीजाभाई जरा नीट बसतात.)

'मला किनई असं वाटतं की हा प्रश्न

निर्माता, दिग्दर्शक व अभिनेता
या सर्वच दृष्टींनी राजकपूर ही
भारतीय चित्रसृष्टीतील एक
लक्षणीय फिगर आहे.
— जब्बार पटेल

**माणूस : बरसात विशेषांक**

**प्रसिद्धी : १ जुलै १९७८**

ज्याच्या त्याच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून राहील. आता मला महिन्याला सहा वड्या लागतात. कुणाला अर्धी वडीही पुरते कारण मुळात चेहरा बऱ्यापैकी असल्याशिवाय नुसता तो तुकतुकीत करण्यात अर्थ आहे का ? '

' मला वाटतं लिरीलाबाई तुम्ही हा फारच चांगला मुद्दा मांडलेला आहे. चेहरा म्हणजे मला वाटते तुम्हाला व्यक्तिमत्त्व–ज्याला आपण 'टोटल पर्सनॅलिटी' म्हणतो ते अभिप्रेत आहे. हे महत्त्वाचे आहे. मघा मी तुकाराममहाराजांचा जो अभंग सांगितला त्यात महाराजांनाही तेच ध्वनित करायचे असावे ? तुपेसाहेब–तुम्ही साबण विकता –'

' हो... '

' असं होतं का की विशिष्ट नावाच्या साबणांनाच जास्त मागणी असते – '

' होतं ना. धुण्याच्या साबणात – सनलाइट, पाचशेएक वगैरे मालाला मागणी असते. लिरीलाबाईंनी सांगितले तसे अलीकडे लिरील फार खपतो–लक्स, रेक्सोना या एक एक वडीमागे मध्यमवर्गीय साधारणपणे दोन तीन हमाम वड्या घेतो – '

' पण मग यामुळे बाकीचे जे साबण बाजारात आहेत त्यांच्या विक्रीवर परिणाम होत असणार ? '

' होतो ना ! '

' पण मग ते साबणही चांगले व्हावेत, लोकांनी त्यांची मागणी करावी यासाठी काय करता येईल ? '

तुपे मख्ख !

' झीजाभाई, मला वाटतं यावर तुम्ही प्रकाश टाकू शकाल – '

' जे मोठी कंपनी सावण बनवते, ज लोकांनी आपले लोक जे लोकांचा साबण मार्केटमध्ये मार खाते. त्याच्याकडे अॅडव्हाइससाठी पाठविला तर तेची क्वालिटी सुधारेल आणि देशामधे सगळे साबण लोकांना आवडू लागेल. '

' म्हणजे 'नवरे घर सुपर' असा विचार आपण मांडलेला आहे. हा नवीन आहे. साबणाचे उत्पादक, सरकार आणि विक्रेते हे एकत्र येतील, परस्पर सहकार करतील तर मला वाटतं एक दोन वर्षांत हा प्रश्न सुटेल. आता साबणधंद्यावर आणखी एक संकट येऊ पहात आहे, तिकडे वळू. निरनिराळ्या प्रकारच्या रासायनिक पावडरी आज बाजारात विकतात. साबणाचेच कार्य या पावडरी करतात. यामुळे साबणधंद्यावर काय परिणाम होईल – लिरीलाबाई ! मला वाटतं तुम्हाला काही तरी म्हणायचंय– '

' मला वाटतं रासायनिक प्रक्रियेने होणारी स्वच्छता ही माणसाच्या कातडीला अपायकारक असल्याने, या पावडरीचा मला काही उपयोग नाही. मला नेहमी मंद मधुर सुगंधाचा, सुबक वेष्ठनातला वडीरूप साबणच वापरायला आवडेल ! '

' यांचं म्हणणं अगदी योग्य आहे. शरीराला अपाय करणारी गोष्ट कुणी वापरणार नाही; पण झीजाभाई, तुपेसाहेब, साबणधंद्यावर या रासायनिक पावडरीचा परिणाम होत असणारच – '

' झीजाभाई तुमाला काही म्हणायचंय ?'

' हे जो पावडरचा साबण आहे ते एक नवी फॅशन आहे. कपड्याला साबण लावताना बाईलोकांना जो शरीराला एक्झरसाईझ होतो तेमुळे त्याचा बांधा पण सुडौल अने चांगला होतो. पावडरीमुळे काय होणार की बाईलोकांच्या हा बेनिफिट निघून जाणार – '

' तुपे, तुम्हाला काही सांगायचं –!'

' झीजाभाई म्हणतात त्यात फारसे तथ्य आहे असे म्हणता येणार नाही. आता या लिरीलाबाई कपड्यांना साबण लावून कपडे धूत असतील ना ? तरी त्यांचा एकूण बांधा इतका सुरेख आहे की मला वाटतं त्यामुळेच त्यांचा या कार्यक्रमात आपण समावेश केलेला आहे.

[ लिरीलाबाई हासतात. ]

[ नियंत्रकाला कुणी तरी वेळ संपल्याची खूण केल्याने त्याच्या चेहऱ्यावरून दर्शकांना समजते तो समारोप करतो. ]

' मला वाटते ही चर्चा कितीही वेळ वाढविता येईल, पण दूरदर्शनाला वेळेचे बंधन असते. झीजाभाई, तुपेसाहेब तुम्ही आपला वेळ खर्च करून इथे आलात आणि आपल्या अनुभवाचा लाभ आपण दर्शकांना देऊन या प्रश्नावर जी मौलिक चर्चा केलीत, त्याबद्दल दूरदर्शनतर्फे मी आपले आभार मानतो. लिरीलाबाई तुम्ही दर्शकांच्या परिचयाच्याच आहात. अनेक कार्यक्रमात तुम्ही भाग घेतलेला आहे. यापुढेही घ्याल या कार्यक्रमासाठी आपण आलात याबद्दल दूरदर्शनतर्फे आभार !

नंतर म्यूझिक, एकमेकात मेल्ट होणारे झीजाभाई, लिरीलाबाई, तुपे यांचे चेहरे आणि सुमारे पाच मिनिटे हा बहारदार कार्यक्रम ज्यांनी उत्पन्न केला त्यांची तपशीलवार तीच तीच यादी.

ही आणि अशी चर्चा आपण दूरदर्शनवर ऐकतो, पहातो. जर आपण सूचनेनुसार दूरदर्शनाचा सामाजिक उपयोग सुरू केला तर अशा चर्चांना कमी वेळ मिळेल. समाजकार्य हे महत्त्वाचे आहे. दूरदर्शनवरून मुली दाखविण्याचा कार्यक्रम हा समाजातील एका ज्वलंत समस्येची सोडवणूक करणारा ठरणार असल्याने त्याला प्राधान्य मिळावे असे आम्हास वाटते.

ज्यांना आमची 'दूरदर्शनवर वधुदर्शन' घडविण्याची सूचना मान्य असेल त्यांनी दूरदर्शनला पत्रे पाठवावी. दूरदर्शन केंद्र हा कार्यक्रम लवकरच सुरू करील अशी आम्हाला आशा आहे. तुकारामांनी म्हटले आहे.

डोळे तुम्ही घ्या रे सुख
भोळे तुम्ही घ्या रे सुख।

–ग्यानबा



पशुवैद्यक तथा पशुसंवर्धन तांत्रिक वृन्दसभा (महाराष्ट्र) या एका शासकीय कर्मचारी संघटनेच्या सोलापूर शाखेचे चिटणीस मो. दी. दाते यांनी 'कुणा अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई व्हावी म्हणून नव्हे तर सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून योजना राबविल्या जाव्यात' या उद्देशाने हा लेख लिहिलेला आहे.

# योजनांची अंमलबजावणी व अधिकाऱ्यांची अनास्था

१४ डिसेंबर ७७ ला सुमारे १० लाख सरकारी-निमसरकारी कर्मचारी, प्राथमिक-माध्यमिक शिक्षक, नगरपालिकांचे कर्मचारी, कोतवाल इत्यादींनी प्रथमच संघटितपणे संपाचे हत्यार उपसले. त्या वेळी मुंबईच्या सचिवालयातील अधीक्षकांपासून खेड्यातील कोतवालापर्यंतचे सर्व श्रमिक प्रथमच एकत्र आले. तसेच अत्यावश्यक सेवाही पहिल्याच वेळी संपात उतरल्या. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येकास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे झळ पोहोचली होती. ५४ दिवसांच्या प्रदीर्घ संपानंतरही तो बारगळला नाही हे मुख्यमंत्र्यांनी प्रांजलपणे कबूल केले. बड्या वृत्तपत्रांनी विरोध केला व नागरी विरुद्ध ग्रामीण, संघटित विरुद्ध असंघटित असे वाद उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. अगदी थोड्या सामाजिक कार्यकर्त्यांनी ही संघटित शक्ती संघर्षाप्रमाणेच रचनात्मक कार्यासाठी वापरण्याचे आवाहन केले होते.

पण निरनिराळ्या योजना राबविताना लाल फितीमुळे त्यांचे लाभ मर्यादित घटकांनाच कसे मिळतात व योजनांची अंमलबजावणी करताना समाजहिताची उपेक्षा कशी केली जाते हे सर्वांना कळावे म्हणून काही नमुने या लेखात देत आहे.

### १ : पशुसंवर्धन पथदर्शक योजना

ग्रामीण भागात पशुसंवर्धनाचे महत्त्व फार आहे. शतमजूर, अल्पभूधारक वा शेतकरी सर्वांकडे पशुधन–शेळ्या-मेंढ्या, गायी, म्हशी, कोंबड्या–काही तरी असतेच. थोड्या शास्त्रीय दृष्टीने व आधुनिक पद्धतीने पशुधन पाळले तर उत्कृष्ट जोडधंदा मिळून उत्पन्न वाढते. म्हणून पशुसंवर्धन पथदर्शक योजना सोलापूर जिल्ह्यात निवडक २० गावांत राबविण्याचे ठरविले. त्यामध्ये विदेशी कोंबड्यांची अंडी उबविण्यासाठी अर्ध्या किंमतीत पुरविणे, जास्त प्रमाणात व चांगल्या प्रतीची लोकर मिळावी म्हणून मेरिनो जातीचे नरमेंढे घेण्यास ५०% अनुदान, तसेच जमनापारी या जादा दूध देणाऱ्या जातीचे बकरे (बोकड) ५०% अनुदानावर देणे, देशी गायींना कृत्रिम गर्भधारणाद्वारे संकरित पैदास करणे हे उद्देश होते. यासाठी जिल्हा परिषदेने २०,००० रु. अनुदानासाठी तरतूद केली होती. योजनेची उद्दिष्टे चांगली होती. आधुनिक तंत्राची गोडी लागावी व इतर गावातील लोकांना उद्युक्त करावे असाही उद्देश होता. अगदी तळातील दुर्बल घटकही शेळ्या–कोंबड्या पाळतात. सर्वांना लाभ दिला जाणार होता. त्यासाठी एकाच व्यक्तीस १२ अंडी द्यावीत असे बंधन होते.

प्रत्यक्षात योजनेचे साध्य झालेले उद्देश निराशाजनक आहेत. एकाच व्यक्तीस ५० अंडी वाटण्यात आली तर नरमेंढे एकेकास ४ पर्यंत दिले. साहजिकच लाभ घेणारे मर्यादित राहिले. दुर्बल घटकांची उपेक्षा झाली व ते लाभापासून वंचितच राहिले. कृत्रिम गर्भधारणेचे काम ५% सुद्धा साध्य झाले नाही. संपूर्ण वर्षभराच्या काळात अधिकाऱ्यांनी पथदर्शक गावांना एकदाच भेट देऊन मार्गदर्शन केले. तेसुद्धा पदाधिकाऱ्यांच्या आग्रहामुळे. अशा प्रकारे एक आदर्शवत योजना अधिकाऱ्यांच्या उपेक्षेमुळे पथदर्शक न बनता पथभ्रष्ट ठरली.

### २ : औषधांची खरेदी

सन १९७७–७८ या वर्षात नियोजनातून रु. १,१०,०००।- इतकी तरतूद औषधपुरवठ्यासाठी केली होती. नेहमी लागणाऱ्या औषधाशिवाय शेळ्या-मेंढ्यातील जंतनिवारण व इतर औषधांसाठी ही जादा तरतूद होती. एप्रिल ७७ पासून जानेवारी ७८ अखेरपर्यंत यापैकी एकही पैसा खर्च झाला नाही. डिसेंबर, जानेवारी या महिन्यात सांसर्गिक रोगामुळे हजारो शेळ्या मेल्या. औषधांचा उपयोग केल्यास आजारी शेळ्या बऱ्या होत; परंतु औषधेच नाहीत! संघटनेने पशुसंवर्धन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे तक्रार केली. आलेले उत्तर पाहून शासकीय यंत्रणा वरिष्ठ पातळीवर कशी बेफिकिरी दाखविते याचा नमुना कळतो. उपसंचालकांनी लेखी कळविले की; जरी ७७–७८ काळाकरिता औषधे खरेदी करण्याची तरतूद असली तरी सुद्धा ती वर्षाच्या शेवटीच शक्यतो घेण्यात येतील. त्या वर्षी रु. १,१०,०००।- इतकी तरतूद होती. मार्चपर्यंत सर्व रक्कम खर्च करून इष्टांक पूर्ण केल्याचे समाधान मिळविले. इष्टांक अर्थ तरतूद खर्च करण्याचाच होता, औषधांचा विनियोग करण्याचा लोकांना त्यांचा लाभ देण्याचा नव्हता. इष्टांक साध्य झाला की उद्देश हा प्रश्न शासकीय यंत्रणेत गौण असतो.

### ३ : जनावरांचे नवीन दवाखाने

जिल्हा नियोजन व विकासमंडळाने रु. २·५० लाख अर्थतरतूद केली व सोलापूर जिल्ह्यात १–१२–७७ पासून १२ नवीन जनावरांचे दवाखाने सुरू करण्याचा शासकीय निर्णय झाला. दवाखाने सुरू होण्यापूर्वी औषधे व आयुधांची खरेदी, फर्निचर घेणे आवश्यक होते व लागणाऱ्या कर्मचाऱ्यांना १–१२–७७ पूर्वी नेमणुकीचे आदेश देणे

योग्य ठरते; परंतु कोठे कोणता माणूस नेमावा याचा निर्णय घेऊन आदेश काढण्यास अधिकाऱ्यांना १९७८ साल उजाडले व १५-१-७८ नंतर दवाखाने सुरू झाले. औषधे व उपकरणे मार्चपर्यंत खरेदी केली. याबाबत पशुसंवर्धन संचालकांकडे संघटनने नापसंती व्यक्त केली; पण चुका कबूल करण्याचा प्रांजळपण वरिष्ठ यंत्रणेत नसावा. त्यांनी दिलेले उत्तर पाहून शासनाबद्दल कीव वाटते. त्यांचे उत्तर पुढीलप्रमाणे– 'जनावरांचे दवाखाने १–१२–७७ पासून सुरू होणे जरुरीचे होते; परंतु सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे त्यास उशीर झाला.' वास्तविक संप सुरू झाला १४–१२–७७ पासून. संपाची पूर्वसूचना अगोदर महिनाभर दिल्यामुळे १–१२–७७ पूर्वी सर्व प्राथमिक कामे पूर्ण करणे जास्त जरुरीचे होते; पण संप सुरू होणार म्हणून अगोदर होणाऱ्या योजनेची अंमलबजावणी पुढे ढकलल्याचे हे एकमेव उदाहरण असावे. संपापूर्वी पुढे करावयाची कामे अगोदर केल्याची उदाहरणे असतील; पण अगोदर होणारी कामे संपात करू म्हणणारे हे एकमेव उदाहरण ! हे उत्तर विनोदी समजावे, बेफिकिरीचा नमुना मानावा की, समाजविकासाच्या कामाकडे उपेक्षेने पाहण्याच्या प्रवृत्तीचे द्योतक मानावे ?

४ : कर्मचाऱ्यांच्या बदल्या

जिल्हा परिषदेतील पशुधन–पर्यवेक्षक व पशुवैद्यक अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे अधिकार जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांना प्रदान केले आहेत. एकूण संख्येच्या १२% बदल्या प्रतिवर्षी करण्याची मर्यादा आहे. तसेच ग्रामविकास खात्याने बदल्या एप्रिल–मेमध्येच कराव्यात-शैक्षणिक वर्षामध्ये करू नयेत असे आदेश दिले आहेत. तथापी या सर्व आदेशांचे व नियमांचे उल्लंघन करून १९७७-७८ या वर्षात ४० बदल्या करण्यात आल्या. एकूण पशुधन–पर्यवेक्षक ५९ आहेत. बदल्या करताना कोणतेही निकष लावण्यात आले नाहीत. कोणतेही कारण नसताना (भ्रष्टाचार, तक्रार वा विनंती) एकेकास वर्षात ३ वेळा बदलण्यात आले. ४० पैकी ९ बदल्या रद्द झाल्या. एकाची तीनदा, ९ जणांची दोनदा बदली झाली. प्रमाण ६६% पेक्षा अधिक झाले. पशुवैद्यकीय अधिकारी १८ आहेत. त्यांपैकी १६ जणांच्या बदल्या झाल्या. दोघांच्या ४ वेळा, एकाची ३ वेळा व ४ जणांची २ वेळा, बदली झाली. इतरांची एकेकदा झाली. एकूण २८ बदल्यांचे आदेश निघाले. त्यांपैकी ९ रद्द झाल्या व १८ बदल्यांची अंमलबजावणी झाली. एका आठवड्यात २ बदल्यांचे आदेश निघाले. यावरून अधिकाऱ्यांची निर्णयक्षमता व शासकीय नियम पाळण्यात दाखविलेली आस्था दिसून येईल. बदल्यामुळे (ऑगस्ट ७७ पासून फेब्रुवारी ७८ पर्यंत आदेश, फेरआदेश निघत होते.) कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान, पाल्यांच्या शिक्षणावर परिणाम झालेच; परंतु त्यापेक्षाही महत्त्वाचा म्हणजे दैनंदिन कामावर झालेला प्रतिकूल परिणाम हा होय.

पशुसंवर्धन विभागातील योजनांची अंमलबजावणी कशी होते किंवा बदल्यांमुळे कर्मचाऱ्यांना त्रास कसा झाला हे दाखविण्याचा हा प्रयत्न नाही. एखाद्या योजनेचा लाभ दुर्बल घटकांना मिळाला नाही आणि वेळेवर औषधपुरवठा न झाल्यामुळे व दवाखाने १-१½ महिना उशीरा सुरू झाल्यामुळे किती नुकसान झाले हा प्रश्न आहेच. कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला हेसुद्धा खरे आहे. त्यापेक्षा सर्वांत महत्त्वाची व काळजी करण्यासारखी वस्तुस्थिती म्हणजे अधिकाऱ्यांची यामागील भूमिका. त्यांची योजना राबविण्याची बेफिकीर वृत्ती व कशीही उत्तरे देऊन समाजविकासाच्या कामाबद्दल दाखविलेली उपेक्षा ! हम करेसो कायदा ही प्रवृत्ती बदलेल का ? त्यासाठीच ही माहिती दिली आहे.

सरकारी कर्मचारी अन्यायाविरुद्ध जरूर लढतील ते योजनांच्या अंमलबजावणीत संपूर्ण सहकार्य देतील; पण योजनांचे उद्देश आकड्यांचे खेळ करून पूर्ण न करता प्रत्यक्षात ते लाभ संबंधितांना मिळावेत ही अपेक्षा आम्ही बाळगतो. या लेखाद्वारे कोणाही अधिकाऱ्यास उघडे करण्याचा हेतू नाही; पण कनिष्ठ सेवकांना व जनतेला उपेक्षित लेखण्याची प्रवृत्ती व बेफिकिरी नाहीशी व्हावी या हेतूने हे लिहिले आहे.

□


तीन राजहंस प्रकाशने

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

फिडेल, चे आणि क्रांती

अरुण साधू । सात रुपये

आणि ड्रॅगन जागा झाला

अरुण साधू । चवदा रुपये

पूर्णिया

अनिल अवचट । सहा रुपये

कथा

# सत्यमेव जयते ?

विलास जडके

बँकेच्या माजगाव शाखेचा ब्रँचमॅनेजर म्हणून विकासने आत्मविश्वासपूर्वक सूत्रे हाती घेतली. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रत्येक वेळी जिल्ह्याच्या ठिकाणी हेलपाटे घालावे लागू नयेत म्हणून बॅंकेने शाखा उघडण्यास सुरुवात केली होती. स्थानिक पुढाऱ्यांचेही त्यांच्या फायद्यासाठी शाखा व्हावी म्हणून प्रयत्न चालू होतेच. जिल्हा कार्यालयातील गोंधळ, शेतकऱ्यांचा वैताग ह्याचा अनुभव असल्याने विकास व त्याचे सहकारी ह्यांनी सुरुवातीपासूनच शाखेची घडी व्यवस्थितपणे बसविण्याचा निश्चय केला होता. जर शेतकऱ्यांना पैसे मिळताना त्रास झाला नाही तर पुढे कर्जवसुलीस त्रास पडणार नाही ह्या खात्रीने विकास व त्याच्या सहकाऱ्यांनी जास्तीत जास्त लवकर कसा कर्जपुरवठा करता येईल ह्या दृष्टीने पावले टाकण्यास सुरुवात केली.

बॅंकेत येणाऱ्या गरजूंना एकाच वेळी आवश्यक ते सर्व कागदपत्र हजर करून अर्ज केल्यास दोन महिन्यांत कर्जाचा पहिला हप्ता मिळेल असे आश्वासन देऊन ते प्रत्यक्षात आणण्यासही सुरुवात केली. आज काही ७।१२ उतारे घ्या, उद्या दाखले आणून देतो, परवा नकाशे देईन असे सांगणाऱ्यांना एकाच वेळी सर्व उतारे आणून दिल्यास कागदपत्र तयार करणे कसे सुलभ होते हे गोड शब्दात पटवून देण्यास विकास व त्याचे सहकारी यशस्वी होऊ लागले. त्यामुळे स्थानिक पुढाऱ्यांची मात्र पंचाईत होऊ लागली. कारण जो तो सरळ बॅंकेत जाऊन काम करून घेऊ लागला. त्यामुळे ह्या लोकांची दलाली कमी झाली होती ना आणि एक दिवस नानासाहेब घांगुर्डयांची स्वारी ऑफिसमध्ये हजर झाली.

'नमस्कार रोकडेसाहेब!' नानासाहेबांनी आल्या आल्या हस्तिदंती दाखवीत नमस्कार केला. 'बसा!' विकासने प्रतिनमस्कार करीत म्हटले. नानासाहेबांची स्वारी स्थानापन्न झाली.

'बोला नानासाहेब, आज इकडे कशी काय पायधूळ झाडली?' विकासने हातातील काम संपवून विचारले.

'तुमच्याबद्दल काही तक्रारी कानांवर आल्या म्हणून म्हटले स्वत: जाऊन नीट चौकशी करावी!'

'असं! साधारण काय 'तक्रारी आल्या?' विकासने विचारले.

'तुम्ही म्हणे लोकांची कागदपत्रांसाठी अडवणूक करता!' नानासाहेब म्हणाले.

'नानासाहेब, हे आमचे छापील माहितीपत्रक! ह्यात दाखविलेले सर्व कागदपत्र एकाच वेळी आणायला सांगतो. तसे झाले की प्रकरण पुढे पाठविणे आम्हांला सोईस्कर पडते!'

'पण नसले कागदपत्र तर तुमचे काय जाते? घ्यायचे प्रकरण दाखल करून, पुढचे आम्ही पाहून घेऊ!'

'माफ करा नानासाहेब! अशी अर्धवट प्रकरणे घेतली तर ती लौकर पुरी होणार नाहीतच उलट आम्हाला जिल्हा ऑफिसला एक्स्प्लेनेशन द्यावे लागते पेंडिंग केसेसबद्दल!'

'हीच तुमची अडवणुकीची वृत्ती! अहो, वर कोण बघत बसतो? तुम्ही आपले पेपर्स घेत जा, उगीच अडवून ठेवू नका! अहो, आता येतील त्यांना पैसे दिले पाहिजेत, बॅंक बुडली तरी चालेल! तुम्हाला काय कुठेही नोकऱ्या मिळतील!'

'छान! तुमचे धोरण चांगले आहे! चालत्या संस्था मोडीत काढायच्या, नोकराना भिकेला लावायचे! तुमचे सरकार येऊन ह्याच कार्यक्रम होणार असेल तर सध्याचे काय वाईट आहे?' विकासने कडवटपणे प्रश्न केला.

'म्हणजे तुम्ही अशीच अडवणूक चालू ठेवणार तर?' नानासाहेबांनी विचारले.

'तुम्ही पुन्हा चुकीचा शब्दप्रयोग करता आहात नानासाहेब. सर्व प्रकरणे तयार आहेत आणि कर्ज देण्याकरिता आम्ही काही दक्षिणा मागितली असती तर अडवणूक म्हणणे ठीक होते. जे कागद बॅंकेच्या नियमाप्रमाणे अत्यावश्यक आहेत त्यांचा आग्रह धरणे म्हणजे अडवणूक नव्हे!'

'ठीक आहे! तुम्ही खुशाल शब्दाचा कीस पाडीत बसा, आम्हाला वर जावे लागेल असे दिसते!' नानासाहेब म्हणाले.

'आनंदाने आपण येऊ शकता!' विकासनेही सांगितले. नानासाहेब तावातावाने बाहेर पडले.

'साहेब, तुम्हाला हे गरम पडेल, नानासाहेब म्हणजे आमदारांचे उजवे हात आहेत!' इतका वेळ गप्प बसलेल्या शेतकऱ्यांपैकी एक जण बोलला.

'हे बघा पाटील, आम्ही लोक आमच्या गावांहून इकडे आलो ते ह्या पुढाऱ्यांपुढे लोटांगण घालायला नक्की नाही! आम्हाला आमचे नियम पाळलेच पाहिजेत आणि ह्या पद्धतीने तुम्हाला लौकर पैसे मिळतात हे तुम्ही बघितलेच आहे!' विकास म्हणाला.

'तुमचा खरा ह्राये हो, पन ह्या मंडळींचा च्यापानी बंद झाला न्हव तुमच्यामुळं?' आणखी एकाचा प्रश्न!

'म्हणजे ह्या लोकांचा मलिदा चालू रहावा म्हणून तुमच्यासारख्या गरिबांची लूट चालू ठेवावी काय?' विकासने विचारले.

'नाय बाबा, आज गावोगाव तुमचा नाव ऐकू येतुया झटपट कामं व्हतात म्हनून! आमचे लोक तुम्हाला कधीच वंगाळ बोलनार न्हाईत; पन आमाला ह्या लोगावानी भिऊनशान वागावं लागतं न्हवं!' पुन्हा एकाची समस्या.

'का? तुम्ही ह्या लोकांचे काय चार चव्वल देणे लागता? तुम्ही आहांत म्हणून ह्यांचे पुढारीपण टिकून आहे. तुम्ही आपल्या पोराबाळांना शिकवता त्यांना पाठवा सोसायटया आणि ग्रामपंचायतींवर! कशाला ह्या पुढाऱ्यांना मोठेपणा देता?' विकासला

एका सहकाऱ्याने विचारले.

'साहेब, तुम्ही आज आहांत उद्या जाणार, आम्हांला इथे रहायचे आहे तेव्हा ह्या लोकांशी वैर परवडणार नाही!' त्यातल्या त्यात एका सुशिक्षिताने प्रामाणिक अडचण व्यक्त केली.

'बरोबर आहे; पण आम्ही मात्र ह्यांच्या पुढे लोटांगण घालणार नाही!' विकासने आपला निर्धार व्यक्त केला.

बँकेचा व्याप वाढतच होता. कर्जवाटपात शाखा अग्रेसर होतीच. इतकेच नव्हे तर कर्जाच्या वापराबद्दलही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले होते; पण अडचण एकच होती ती म्हणजे विकासची नियमावर बोट ठेवण्याची वृत्ती व स्वच्छ हात! तो स्वतःच नियमानुसार वागत असल्याने सहकारीही त्याचेच अनुकरण करीत होते. ह्यामुळे असंतुष्ट असणारे पुढारी सतत वर तक्रारी करीत होते. अखेरीस बँकेच्या अध्यक्षांनी विकासची हजेरी घेण्याचे ठरविले.

'काय रोकडे? त्या नाना घांगुर्डेची तक्रार आहे तुझ्याविरुद्ध!' अध्यक्ष म्हणाले.

'मला कल्पना आहे!' विकासने उत्तर दिले.

'अरे, कशाला तू प्रकरणे अडवून ठेवतोस? द्यायची पाठवून इकडे! पुढचे सारे आम्ही बघितले असते!'

'माफ करा, आपण जर मॅनेजरना तशा लेखी सूचना देण्यास सांगितले तर अर्धवट प्रकरणे हेड-ऑफिसला पाठवायला माझी हरकत नाही!' विकासने खुलासा केला.

'अरे, इतके नियमानुसार काम करून चालत नाही. तू आपली पद्धत बदल नाही तर आम्हांला तुझी बदली करावी लागेल!' अध्यक्षांचा सल्ला.

'ठीक आहे, आपण बदली करू शकता!' विकासने उत्तर दिले.

पण विकासची बदली झाली नाही. सर्व स्टाफ व मॅनेजरनीही त्याची बाजू घेतल्याने कार्यकारीला आपला निर्णय त्या वेळी तरी तहकूब ठेवावा लागला. विकासला ह्याची कल्पना होती; पण त्याने आपले काम तसेच चालू ठेवले. त्या भागातील शेतकऱ्यांचेही त्याच्याबद्दल मत चांगले झाले होते. त्यामुळे लोक कर्जाची परतफेडही वेळीच करीत होते. फारसे परिश्रम न घेता वसुली ८५% झाली होती. ह्या सर्व गोष्टी स्थानिक राजकारणास अनुकूल नव्हत्या. त्यामुळे पुढारी लोकांची नाराजी वाढत होती. निवडणुका जवळ आल्या. आता काही तरी करणे भाग होते. एक दिवस स्वतः आमदार दगडोबा दांगट विकासच्या खोलीवर आले.

नमस्ते रोकडेसाहेब, निवडणुका जवळ आल्या!' त्यांनी म्हटले.

'मग?' विकासने प्रतिप्रश्न केला.

'नाही म्हणजे तुमची जरा आम्हांला मदत लागेल म्हणून सांगण्यास आलो.' आमदारसाहेब म्हणाले.

'शक्य असेल तितकी करीन!' विकासने आश्वासन दिले.

'नाही जरा वसुलीवरचा जोर कमी करा, लोकांचे अडचणीचे दिवस आहेत!' आमदारसाहेब म्हणाले.

'कुणाच्या अडचणीचे? सर्वसामान्यांनी वेळीच फेड केली आहे. काही नाठाळ धेंडेच मागे राहिली आहेत. त्यांचेवर कारवाईच करावी लागेल!' विकासने सांगितले.

'अहो, काही ना काही तरी अडचणी असतात एकेकाच्या, जरा समजून घेतले पाहिजे!'

आमदार समजुतीच्या सुरात म्हणाले.

'अहो,' एक वर्ष अडचण असेल, सतत चार वर्षे अडचण! ह्यांचे आदर्श गावापुढे राहिले तर १० वर्षांत बँक मोडीत निघेल!' विकास म्हणाला.

'अहो, पण त्यात तुमचे काय नुकसान आहे?' आमदारांनी विचारले.

'छान! म्हणजे पैसे देताना आमची माणसे म्हणून लवकर द्या, वसुलीच्या वेळी आमची माणसे म्हणून सांभाळून घ्या, छान व्यवहार आहे! आमची बँक म्हणून बँकेची काळजी मात्र कुणी घेऊ नका! कूळकायद्याचे पैसे भरू नका असे सांगून लोकांना बँकेकडून कर्जे घ्यायला लावलीत, आता बँकेची कर्जे भरू नका सांगून लोकांच्या जमिनी लिलावात काढा! तुमची आपली मालमत्ता वाढते आहे!' विकास संतापाने बोलला.

'आमची मालमत्ता काढायचे कारण नाही! आमचे ऐकणार आहात की नाही बोला!' आमदारांनी घुश्शात विचारले.

'जमणार नाही!' विकासने उत्तर दिले.

'ठीक आहे कशी तुमची बदली होत नाही तेच बघतो!' असा दम देऊन आमदारमहाशय तरातरा निघून गेले.

आठ दिवसांत विकासच्या हातात बदलीचा हुकूम पडला. त्याचे जागेवर आमदारांच्या भाच्याची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती. लोकांना आश्चर्याचा धक्काच बसला; पण पाठोपाठ त्यांना दुसरा धक्का बसला स्वतः विकास दगडोबांच्याविरुद्ध निवडणूक लढविणार असल्याचे ऐकून! स्वतःचे सहकारी, मॅनेजर वगैरेंनी समजुतीच्या गोष्टी सांगून सुद्धा विकासने दगडोबांविरुद्ध नॉमिनेशन पेपर भरले त्याला प्रचारासाठी बिनपगारी रजा घ्यावी लागली. त्याच्यासारखेच काही वेडेपीर त्याचे बाजूने उभे राहिले. प्रचाराचा धूमधडाका सुरू झाला. अत्यंत विषम साधनसामुग्री असून सुद्धा विकासचा प्रचार पद्धतशीर चालू होता. गांवोगावी सभा घेऊन तो लोकांना सांगत होता.

'अरे, ह्या पुढाऱ्यांना भिऊन किती दिवस जगणार आहात? सोसायटयांचे अध्यक्ष दगडोबांचे मेहुणे, सरपंच दगडोबांचा मित्र, सभापती दगडोबांचा भाऊ, बँकेवर दगडोबांचा चुलता, काय तुमच्या भागात दुसरे लायक तरुणच नाहीत? चोरांपासून होणारी लूट थांबवावी म्हणून सहकारी संस्था काढावयाच्या तर इथे सगळ्या सगळ्या चोरांच्याच हातात सोसायटया! त्यातून तुमचे भले काय होणार? आमदार म्हणतात 'बँक काय रोकडेच्या ××× ची आहे काय? पैसे काय त्याच्या खिशातले जातात काय?' मी सांगतो बँक माझ्या कुणाचीच नाही, म्हणूनच तिला जपले पाहिजे. कारण ती तुमची सर्वांची आहे, आमदारांच्या सासऱ्यांची नाही. मी पैसे माझ्या खिशातले देत नाही; पण माझ्या खिशातही ते पडत नाहीत. मी इथे येण्यापूर्वी ह्या पुढाऱ्यांना किती दलाली द्यावी लागत होती ते आठवा आणि आता किती झटपट कामे होतात ते पहा! तुमची मुले शाळेतून शिकून येतात त्यांचे ताब्यात ह्या संस्था द्या! हे राजकारणी पुढारी हवेतच कशाला? तुमच्या स्वतःच्या पायावर उभे रहा! तुमच्या पायावर ह्यांचे डोलारे उभे आहेत. तुम्ही जरा बाजूला व्हा हे पत्याच्या बंगल्याप्रमाणे कोलमडून पडतील!'

लोकांना त्याचे म्हणणे पटत असे. लोक

तसे कबूल करीत; पण प्रचारासाठी एकजण पुढे येत नव्हता. विकास आणि त्याचे साथीदार तंगड्यातोड करीत होते. कुठे मिळाली तर चटणी-भाकरी खात होते नाही तर उपाशी मुक्कामाला येत होते; पण पोटतिडीकेने आपली बाजू मांडीत होते. ह्याउलट दगडोबांकडे माणसांची रीघ लागत होती, गाड्यांचे ताफे फिरत होते, लोकांना खायला-प्यायला मुबलक होते, पाण्यासारखा पैसा खर्च होत होता तर विकासकडे ह्या सर्वांचाच ठणठणाट होता ! कमी नव्हती ती जिद्द व आत्मविश्वास !

अखेर निवडणुकीचा दिवस उजाडला. आमदारांच्या गाड्या आणि स्वयंसेवक लोकांना आणण्यासाठी धावत होते. प्रत्येक मतदानकेंद्रावर गरम व थंड पेयांचा मारा होत होता, हवे–नको बघितले जात होते. ह्या बाबतीत विकास पूर्णतः दरिद्री होता. काही गावच्या तरुणांनी तेथील जबाबदारी आपण होऊन स्वीकारली होती, तर इतरत्र परमेश्वरावरच भरवसा होता. सुदैवाने सर्वत्र मतदान सुरळीतपणे पार पडले. दोन दिवसांनी जिल्ह्याच्या ठिकाणी मतमोजणीला सुरुवात झाली. तासातासाला मतदानाचे आकडे बाहेर पडत होते. सुरुवातीस आमदारांची सरशी दिसत होती, नंतर विकास पुढे आला परत आमदार असा चढउतार चालू होता. तसेच मनाचे हेलकावेही चालू होते आमदारांच्या पाठीराख्यांनी शृंगारलेली गाडी आणून ठेवलीच होती. दगडोबांना चार मते जास्त पडली की जल्लोष व विकासला चार मते जास्त पडली की शिमगा चालू होता. नंतर विकासचा लीड वाढू लागला. आशा पल्लवित झाल्या; पण पुन्हा दगडोबा पुढे गेले. अखेरीस रात्री ८–२० ला कलेक्टरसाहेबांनी निकाल जाहीर केला, ' माजगाव मतदार संघ एकूण मतसंख्या १,६५,७५३, झालेले मतदान १,४३,५२४, बाद मते ९१७ मतांची विभागणी श्री. दगडोबा दांगट १,०३,८३५ विजयी विरुद्ध श्री. विकास रोकडे ३८, ७, ७२ पराभूत!' □

पुस्तके

# जरीला

## अनुभवांशी इमान राखणारे लिखाण

जरीला ही भालचंद्र नेमाडेंची तिसरी कादंबरी. कोसला आणि बिढार ह्या त्याआधीच्या कादंबऱ्या. आतापर्यंतच्या ह्या साहित्यिक वाटचालीत, नेमाड्यांनी कादंबरीलेखनाची आपली अशी एक शैली निर्माण केली आहेच. जरीला ही त्याला अपवाद असत नाही. कोसलामध्ये नेमाड्यांनी सुस्थितीतल्या, ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी आलेल्या, एका तरुणाच्या कॉलेजजीवनाचा कालखंड चित्रित केला आहे. कोसला हा मराठी कादंबरीच्या बाबतीतला एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. नेमाड्यांची ' जरीला ' देखील त्याच कॉलेजजीवनाशी संबंधित आहे. एक लहानसे गाव, त्यातली एक शिक्षणसंस्था, अशा संस्थेचे पदाधिकारी, तिथे शिकविणारे प्राध्यापक आणि त्या विशिष्ट गावातले वातावरण ह्या सगळ्यातूनच ही कादंबरी आकार घेते. त्यात अनेक व्यक्तींचा समावेश होत असला तरी ह्या वातावरणाच्या केंद्रस्थानी एकच व्यक्ती असते आणि ती म्हणजे चांगदेव ऊर्फ सी. ए. पाटील. थोडक्यात जरीला ही केवळ चांगदेवचीच कादंबरी आहे. त्याच्या संदर्भातच ती घडत जाते आणि त्याच्या दृष्टीतूनच आकारते.

कोसलाप्रमाणेच इथेही नेमाडे कॉलेजच्या एका शैक्षणिक वर्षाचा काळ विचारात घेतात. फक्त हे कॉलेज शहरी भागातले नसून ग्रामीण भागात उभारलेले असते. बराचसा उशिरा म्हणजे भर पावसातच चांगदेव कॉलेजात जॉइन होण्यासाठी नव्यानेच गावात येतो. इथेच कादंबरीला सुरुवात होते.

तो ते शैक्षणिक वर्ष संपतानाच आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन ते गाव सोडतो. आणि इथे ती कादंबरी समाप्त होते. तसा त्याच्या तिथल्या वास्तव्याचा काळ फार काही मोठा नसतो, पण ह्या वर्षभराच्या काळातच बरेच काही घडलेले असते. चांगदेवाच्या आयुष्यात घडलेल्या ह्या घटनाच नेमाड्यांनी जरीलात तपशिलाने मांडल्या आहेत.

चांगदेव इंग्रजीचा प्राध्यापक म्हणून कामाला सुरुवात करतो. ग्रामीण प्राध्यापकांच्या वाट्याला आलेली व्यावसायिक अस्थिरता त्याच्याही वाट्याला आलेली असते. म्हणूनच तो एक नोकरी सोडून ह्या दुसऱ्या नव्या नोकरीत स्थिरावू पहात असतो. तसे ते गाव त्याला मनापासून पसंत असते आणि तिथले विद्यार्थी, तिथली माणसे ह्यांच्याशीही त्याने उत्तम जमवून घेतलेले असते. ह्या जमवून घ्यायच्या वृत्तीमुळेच चांगदेवचे सुरुवातीपासूनच तिथे चांगले बस्तान बसते. सर्व वयांचे, जातिधर्मांचे प्राध्यापक त्याचे मित्र बनून जातात. त्याच्या घराचा अड्डा बनवितात. तिथे बुद्धिबळे खेळतात, खातात, पितात. हे सर्व इतके उत्कृष्टपणे जमते की, प्रिन्सिपल जीजी त्याच्या जागेला इव्हिनिंग स्टाफ रूम म्हणतात. मुळात चांगदेव कष्टाळू असतो. आपल्या विषयात त्याची चांगलीच गती असते. त्याचे वाचनही दांडगे. परिणामी तो एक निष्णात शिक्षक ठरतो. विद्यार्थ्यांचाही तो सहज विश्वास संपादन करतो आणि त्यांच्यात लोकप्रिय होतो.

नेमाड्यांचा चांगदेव येवढाच कुणी नसतो. नेमाड्यांच्या इतर नायकांप्रमाणेच तोही एक स्वतंत्र बुद्धीचा माणूस असतो. आपल्या विचारी मनाला पटेल त्याचप्रमाणे तो वागतो, निदान वागण्याचा प्रयत्न तरी करतो; पण कॉलेजातल्या वातावरणाला

त्याचा हा स्वभाव पोषक नसतो. राजकारण, जातीयवाद, हुजरेगिरी हाच त्या वातावरणाचा स्थायी भाव असतो. स्वतंत्र बुद्धीचा हा तरुण मात्र असल्या सर्व गोष्टींपासून अलिप्त असतो. तो स्वतःशीच प्रामाणिक रहातो. ह्या प्रामाणिकपणापोटीच तो जातीयतावादाला, वशिलेबाजीला विरोध करतो. त्या विरुद्ध दंड थोपटून उभा रहातो. अशा संस्थेतले एकंदर वातावरण, तिथल्या पदाधिकाऱ्यांचे गट, त्यांची सत्ता टिकविण्यासाठी चाललेली धडपड, त्यांचे आपापसातले शह-काटशह, चांगल्या माणसांची निर्दयपणे केली जाणारी उपेक्षा, त्यांना डावलून घेण्यात येणारी स्वतःची सामान्य दर्जाची माणसे, वरच्या श्रेणी देताना केले जाणारे जातीय हिशोब, त्यांची तिथली लफडी-कुलंगडी ह्या साऱ्यांचे भेदक दर्शन नेमाडे आपल्या कादंबरीतून घडवितात आणि त्यातूनच ती अत्यंत प्रभावी होत जाते.

वास्तववाद हा नेमाडयांच्या कादंबरीचा आत्मा आहे. त्यांच्या शब्दांतून जाणवते ती अनुभवांशी असलेली त्यांची विलक्षण निष्ठा आणि अशा निष्ठेमुळे हे सर्वच लिखाण फारच प्रत्ययकारी झाले आहे. अनुभवांच्या बांधिलकीमुळेच नेमाडे प्रत्येक प्रसंग, व्यक्ती, वातावरणाचे अत्यंत तपशीलवार वर्णन करू शकतात. मग ती गावाबाहेरच्या हायवेवर लोळणारी आणि वेळोवेळी चिरडून मरणारी डुकरे असोत, सुलतानच्या फलाटीतली सुतार काम करणारी माणसे असोत, घाटात पाऊस कापीत जाणारी बस असो, कॉलेजातली मेस असो, तळमजल्यावर रहाणारे एखादे नवविवाहित जोडपे असो, अशा असंख्य गोष्टींचे, प्रसंगांचे, व्यक्तींचे नेमाडे अत्यंत नेटके वर्णन करतात. आपल्या शब्दांतून ते वातावरण जिवंत करीत जातात. अशी जिवंत वाटणारी वर्णने हे नेमाडयांच्या जरीला ह्या कादंबरीचे फार मोठे सामर्थ्य आहे. नेमाडयांच्या कादंबऱ्यांच्या बाबतीत पुनरुक्तीचा आरोप करण्यात येतो; पण अनुभवांशी इमान राखणाऱ्या लिखाणाच्या संदर्भात अशी पुनरावृत्ती अपरिहार्य ठरते. स्वतःच्या जीवनाशी प्रामाणिक राहणाऱ्या लेखकाला ती मुळातच टाळणेही सर्वथा अशक्यप्राय असते.

जरीला ही कोसलासारखी ॲबस्ट्रॅक्ट पद्धतीची कादंबरी नाही. नेमाडयांचा नायक चांगलाच सुसंबद्धपणे विचार करतो. बऱ्याचदा व्यवहारी पद्धतीनेच वागताना दिसतो. माणसामाणसांतल्या संबंधांच्या खोटेपणाचे, व्यवहारांच्या नागवेपणाचे, प्रस्थापितांच्या निर्लज्जपणाचे त्याला चांगलेच भान असते. अर्थात आधीच्या संस्थेतल्या अनुभवांतूनच पोळून घेऊन त्याने हे भान मिळविलेले असते आणि त्यामुळेच प्रसंगी प्रक्षुब्ध होणाऱ्या, उसळून बंड करणाऱ्या, तुटून पडणाऱ्या मनाला तो कुठे तरी आवर घालू शकतो; पण असे काही करूनदेखील तो स्वतःचे स्वत्व जपण्याबद्दलही तितकाच जागरूक राहतो. चांगदेवचा समंजसपणा, स्वतंत्र विचारप्रवृत्ती, दुसऱ्याच्या सुख-दुःखांत सहज समाविष्ट होण्याची तयारी, दुर्बलांबद्दल वाटणारी अपार करुणा ह्या गोष्टीच त्याला चटकन दुसऱ्याजवळ नेऊन सोडतात. भेटणारी सारीच माणसे त्याला आपलासा मानतात. त्याच्या बाबतीत, जात-पात, धर्म, राग-लोभ अशा क्षुद्र गोष्टी विसरतात आणि सगळे विसरून त्याच्या प्रवाही व्यक्तिमत्त्वावर प्रेम करतात.

नेमाडयांचा नायकही हळूहळू आपले शेख, माळी, कासार, वाणी, मिश्रा यांसारखे सहकारी प्राध्यापक, फॉरेस्ट ऑफिसर चौधरी, सुलतानसारखी बाहेरची माणसे, कॉलेज, विद्यार्थी, गाव ह्या साऱ्यातच हरवून जातो. लग्न करून टाकून आपले एकटेपण संपविण्याच्या मागे लागतो आणि आपले फिरते जीवन सोडून ह्याच चांगल्या गावात, चांगल्या लोकांत स्थिरावण्याचा निर्धार करतो; पण त्याचा सेटल होण्याचा तो प्रयत्नही फसतो. त्याच्या लग्नाचे जमू शकत नाही. त्या जातीय वातावरणात आपली तड कधीच लागू शकणार नाही हे मनोमन जाणून तो मोठ्या शहरात नवी नोकरी स्वीकारतो. आपल्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या अनेक सहकाऱ्यांचा आग्रह कठोर मनाने मोडून काढतो आणि पुन्हा एकदा अस्थिर जीवनातल्या पुढच्या वाटचालीला निघतो.

नेमाडयांची ही कादंबरी ग्रामीण शिक्षणसंस्थेतल्या वातावरणातला विदारक वास्तववाद प्रभावीपणे मांडते. ही सर्व यंत्रणाच अप्रामाणिक, भ्रष्टाचाराने बरबटलेली असते. त्याच्याच पायावर उभी असते. स्वाभाविक अशी नीतिशून्य यंत्रणा शैक्षणिक विचारांपेक्षा वैयक्तिक स्वार्थाचाच नेहमी विचार करीत असते. त्यामुळे ती चांगदेवलाच काय तर तिथे वर्षानुवर्षे असलेल्या कोणालाच न्याय देणार नसते. प्रामाणिकपणे शिकवून, संस्थेची सेवा करून बाहेर पडणाऱ्या चांगदेवलादेखील निर्लज्जपणे फटकारते आणि राजिनाम्याच्या नोटिस-पीरिअडचा पगार भरल्याशिवाय मुक्त करण्यास नकार देते. आपल्याला मिळालेली ही निर्दय वागणूक हा चांगदेवच्या तिथल्या वास्तवातला सर्वात माणुसकीशून्य अनुभव ठरतो. ह्या अनुभवाने तो चांगलाच अस्वस्थ होतो, दुखावला जातो; पण तो अनुभवच त्याला पुढच्या वाटचालीसाठी आणखी काही शिकविणार असतो. माणूस आणि व्यवहार ह्यांच्या मर्यादा त्याच्यासाठी नव्याने आखणार असतो.

जरीला ही नेमाडयांची एक उत्तम कादंबरी म्हणावी लागेल. त्यातील अनुभवांचे चित्रण विलक्षण प्रभावी ठरते. ही केवळ चांगदेवचीच कथा रहात नाही. अलीकडच्या काळात, ग्रामीण शिक्षणक्षेत्रात अन्यायाखाली आर्थिक आणि मानसिकदृष्ट्या अक्षरशः भरडून निघणाऱ्या अनेकांची ही जीवनकहाणी ठरू शकेल. कोसला हा मराठी कादंबरीच्या वाटचालीतला नवा टप्पा ठरला. तर त्याच मराठी कादंबरीच्या क्षेत्रात 'जरीला' ही मोलाची भर ठरेल.

—अशोक प्रभाकर डांगे

जरीला

भालचंद्र नेमाडे

पॉप्युलर प्रकाशन

पृष्ठे : २५३

मूल्य : वीस रुपये.

# आमचे ग्रंथालय

## Vivien Leigh

(A Biography)
By Anne Edwards
(Siman & Sehuster)

व्हिवियन ले ही नटी तिच्या Gone With The Wind या चित्रपटातील भूमिकेमुळे प्रख्यात झाली. खरे तर ती त्या आधी १९३५ मध्ये 'द मास्क ऑफ व्हायलन्स' या चित्रपटात एका वेश्येच्या भूमिकेमुळे प्रकाशझोतात आली.

व्हिवियन ले हिचा जन्म १९१३ मध्ये दार्जिलिंग येथे झाला. तिची आई फार समाजाभिमुख होती. इतकी की तिच्या कामात तिला व्हिवियन आड आली व आईने आपल्या मुलीला सात वर्षे लंडनबाहेर एका कॉन्व्हेन्टमध्ये शिकायला ठेवले. या सात वर्षांत मुलीची व आईवडिलांची फारशी भेट होत नसे!

कॉन्व्हेन्टमधून घरी आली तेव्हा ती १७ वर्षांची होती. दिसायला भलतीच सुंदर होती. पुढे एका ३१ वर्षांच्या बॅरिस्टरबरोबर (हर्बर्ट) तिचे लग्न झाले, परंतु 'फायर ओव्हर इंग्लंड' या चित्रपटात तिने लॉरेन्स ऑलिव्हरबरोबर नायिकेची भूमिका केली व या भूमिकेच्या प्रेमातून खरे प्रेम निर्माण झाले. तिचे दुसरे लग्न ऑलिव्हरशी १९४० मध्ये झाले. 'गॉन विथ द विंड'मध्ये तिला ॲकॅडेमी ॲवॉर्ड मिळाले.

लॉरेन्स ऑलिव्हरच्या प्रतिभेपुढे तिला उणे उणे वाटू लागले. तिचे मूडस् घड्याळाच्या लंबकाप्रमाणे अति आनंदापासून काळ्याकुट्ट घोर निराशेकडे जाऊ लागले. लॉरेन्स ऑलिव्हरला वाटले ही काचेसारखी सुंदर व ठिसूळ चीज आता मोडेल. शेवटी शेवटी तिला स्किझोफ्रेनिया आणि टी. बी. झाला आहे, असे डॉक्टरांनी निदान केले. जुलै ७।१९६६ मध्ये अमेरिकेमध्ये एका श्रीमंत नटीचा मृत्यू टी. बी. ने व्हावा हे एक दुर्दैवच! कारण टी. बी. वर इतकी प्रभावशाली औषधे निघाली आहेत की त्याने मृत्यू क्वचितच ओढवत असेल. विशेषत: जिचे रहाणीमान व्हिवियनइतके उंच आहे त्या वर्तुळात तर टी. बी. जवळजवळ नामशेषच झाला आहे. टी. बी. वर आयझोनियॅझीड, पास, स्ट्रेप्टोमायसिन अशी अनेक औषधे आहेत.

स्किझोफ्रेनिया मात्र एक Science fiction सारखा गूढ रोग आहे. या रोगाबद्दल अनेक सिद्धांत मांडले गेले आहेत. कसल्या तरी एन्झाइमची कमतरता, समाजातील चुकीच्या मोजपट्टया, आर्थिक सामाजिक समस्या (Socio-economic condition) आनुवंशिकता व इतर अनेक कारणे दिली गेली आहेत. लॉरेन्स ऑलिव्हरने तिला मानसिक तज्ज्ञाकडे नेण्याचा प्रयत्न केला परंतु व्हिवियनने नकार दिला. आर. डी. लँगने तर या विषयावर ४।५ पुस्तकेच लिहिली आहेत.

टेनेसी विल्यम्सच्या 'स्ट्रीट कार नेम्ड डिझायर' या पुस्तकाच्या आधारावर त्याच नावाच्या चित्रपटात सुद्धा व्हिवियनने मार्लोन ब्रांडोबरोबर काम केले होते.

जॉर्ज ब्युकॉर या गृहस्थाने आधी सुचविले की, ऑलिव्हर व व्हिवियनने रोमिओ-ज्युलिएटमध्ये भूमिका कराव्यात. ते दोघे खरोखरच उत्कट प्रेमिक होते म्हणून 'रोमिओ व ज्युलिएट मध्ये त्या दोघांच्या भूमिका अगदी उत्कृष्ट वठल्या. प्रेम करून करून त्या दोघांची भूक भागेनाशी झाली होती. खऱ्या जीवनात व चित्रपटात दोन्ही ठिकाणीं प्रेम केल्यामुळे त्यांची भूक थोडीशी शमली.

हे दोघे इतके प्रेमात पडले होते, की कायद्यानुसार घटस्फोट घेतल्यानंतर ठराविक मुदत जायला हवी असते, ती गेल्यानंतर दुसऱ्याच मिनिटाला त्यांनी लग्न लावले. त्यांचे लग्न ३१ ऑगस्ट १९४० रोजी १२ वाजून १ मिनिटाने झाले. लग्नानंतर सर्व नियतकालिकांनी या दोघांना अमेरिकेचे प्रख्यात प्रेमिक म्हणून उचलून धरले. खरे तर ते दोघेही ब्रिटिश होते!

व्हिवियन कधीकधी तिरसिंगराणीसारखी वागे, पण ऑलिव्हरला वाटले व्हिलियनला अल्कोहोल सहन होत नाही म्हणून तसे होत असेल. खरं म्हणजे ऑलिव्हर 'रॅशनलाईझ' करीत होता. स्वत:ची वंचना करीत होता. तो यशाच्या मागे धावत होता म्हणून त्याचा वस्तुस्थिती उशीरा कळली. बऱ्याच वेळेला आपल्या वागणुकीबद्दल आपण 'रॅशनलाईझ' करतो. आपल्या वर्तनाबद्दल सबब, सबळ कारणे शोधतो. अशा वेळेला वर्तणुकीचे खरे कारण आपले आपल्यालाच कळत नाही.

व्हिवियन दिसायला जशी नाजूक होती


### NEW TITLES RECEIVED

1. **Living an Era – Vol. II –** ( Political Memoirs ) – D. P. mishra — Rs. 75·00
2. **A Presumption of Innocence –** ( Bestseller – A true crime story ) Ludovic Kennedy — Rs. 21·35
3. **The Grass is Always Greener Over the Septic Tank –** ( Bestseller Humour ) – Erma Bombeck — 70 pence

### मराठी

१. परलोकविद्या – स्वानंदसरस्वती — रु. १५·००
२. दुर्गी – (कथासंग्रह) – सुरेश वेंगुर्लेकर — ,, १२·००
३. आत्मशक्ती – न. खं. क्षीरसागर — ,, ९·००

- 'फिनिक्स'चे सभासदत्व ही आपल्या उच्च अभिरुचीची साक्ष आहे!
- अत्युत्तम पुस्तके.
- गाजलेल्या पुस्तकांच्या एकापेक्षा जास्त प्रती.
- दंड वगैरे जादा आकार नाही.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

तशी मनानेही होती. दुसऱ्या विश्वयुद्धातील जीवांची व मालमत्तेची झालेली हानी पाहून मडचाळाचा लंबक परत आनंदापासून व रंगीत स्वप्ननगरीपासून घोर निराशेकडे वळे.

ऑलिव्हरला वाटले की, तिला एखादी मनपसंत भूमिका दिली की, तिची गाडी रुळावर येईल. बर्नार्ड शॉच्या 'डॉक्टर्स डायलेम्मा'मध्ये तिने जेनिफर डयुबेडाचे काम करावे असे त्याने तिला सुचवले. हे नाटक लंडनमध्ये १३ महिने चालले. बर्नार्ड शॉ तिकडे असतानाही ते नाटक बघायला गेला नाही. कारण शॉने ठरवून टाकले होते की, एकदा रिहर्सल पाहिल्यानंतर परत कधी आपण नाटक बघायचे नाही.

बर्नार्ड शॉने जर संमती दिली तर व्हिवियनला पास्कलच्या 'सीझर व क्लिओपॅट्रा' या चित्रपटात काम करावयाचे होते. (शेक्सपियरचे 'अँण्टनी व क्लिओपॅट्रा' हे क्लिओपॅट्राचा उत्तरार्ध आहे तर शॉचे 'सीझर व क्लिओपॅट्रा' हा तिचा पूर्वार्ध आहे.'

एकदा व्हिवियन शॉच्या घरी त्याला भेटावयास गेली होती. व्हिवियन मांजरीच्या गोजिरवाण्या पिल्लासारखे वागावयास लागली. शॉने सहज शब्द टाकला की, तिने 'क्लिओपात्राची' भूमिका करावी. व्हिवियनने अगदी निरागसतेचा व निर्लेपतेचा आव आणला व शॉला विचारले, 'एवढी मोठी भूमिका मला पेलेल का?' शॉने घटकाभर आपली दाढी कुरवाळली व उत्तर दिले, 'हरकत नाही. क्लिओपात्राची भूमिकाच अशी आहे की, शेवटी ती स्वतःच अभिनय करायला लागेल!'

दुसरे विश्वयुद्ध जोरात सुरू होते. ऑलिव्हर व व्हिवियनचा रोमान्स त्याही-पेक्षा जोरात चालला होता. एक आदर्श व हेवा वाटावा असा तो जोडा होता.

पब्लिकमध्ये व्हिवियन अगदी शांत व शिष्टाचारप्रिय होती; पण बारकाईने पाहिले तर आत कुठे तरी मख्खी होती, असे दिसून आले असते.

पास्कल हा बारकाईने पहाणारा होता. त्याने 'सिझर अँण्ड क्लिओपात्रा' निर्माण केला होता. या चित्रपटात एक मेजवानीचा प्रसंग आहे. या वेळेला क्लिओपात्रा पॉथिनसचा खून करण्याचा आदेश देते. या वेळी व्हिवियनचे बरेच क्लोझ-अप्स आहेत. या क्लोझ-अप्समध्ये तिच्या चेहऱ्यावर इतकी Passion दिसू लागला की, पास्कल हतबुद्ध झाला. इथेच पास्कलला व्हिवियनच्या गंभीर आजाराची पहिली जाणीव झाली.

या पुस्तकात ऑलिव्हर व व्हिवियन यांचा संघर्ष व शेवटी त्यांची विवाहनौका वादळात सापडून खडकावर कशी आदळते वगैरेची माहिती पुष्कळ संवेदनाशील व वाचनीय आहे.

—जे. एन्. पोंडा
दि फिनिक्स लायब्ररी

---


# जनांचा प्रवाहो चालिला

लेखक : विनय हर्डीकर

**किंमत : वीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, पुणे ३०

आणीबाणीचं आसुरी आव्हान ओळखणारं,
त्या आव्हानानं अस्वस्थ होऊन पेटून उठणारं आणि
विकासशील वैचारिक निष्ठेनं या जुलमाला
प्रकटपणे हटकणारं.......विनयचं
संवेदनाक्षम, चिकित्सक, रसरशीत मन....
या मनाची
अन् या मनात पडलेल्या असंख्य, अथांग प्रतिबिंबांची
ही मार्मिक आणि मर्मभेदक कहाणी....

या लेखनाला कादंबरी म्हणावं कीं आत्मकथन?
की आपलं कहाणीच?
म्हणावं काहीही, एक खरं...
प्रांजळ मनानं वाचणाऱ्याला ही कहाणी मनोमन बोलकं करील,
अंतर्मुख करील, प्रत्येकापुढे निर्लेप आरसा धरील—
जबाबदारीनं, सहानुभूतीनं....आणि
आपुलकीच्या कडव्या उत्कटतेनं.

दुर्मिळ असे अस्सल बावनकशी क्षण विनय जगला.
ते वाया गेले नाहीत.
या कहाणीत त्या क्षणांना तितकंच अस्सल,
तितकंच बावनकशी रूप लाभलं आहे.

प्रा. स. शि. भावे

# शहा आयोग, दोन उदाहरणे : पृष्ठ ५ वरून

मध्यापर्यंत या सगळ्यांची मुक्तता झाली. धवन यांनी आयोगापुढे असे सांगितले की असे एक पत्र गुप्तहेरखात्याने पकडले आहे व त्याबद्दल आम्ही, म्हणजे दिल्लीचे नायब राज्यपाल व संबंधित अधिकाऱ्यांनी या लोकांना पकडण्याचा निर्णय घेतला आहे असे सुशीलकुमार यांनी मला सांगितले. त्यांनी असाही पवित्रा घेतला आहे की, 'हे प्रकरण दिल्ली प्रशासनाशी संबंधित आहे. त्यांना योग्य वाटेल तो निर्णय त्यांनी घ्यावा' असे इंदिरा गांधी म्हणाल्या.

या म्हणण्यात फारसे तथ्य दिसत नाही. कारण धवन व श्रीमती गांधी यांनी कितीही कोलांटचा उड्या मारल्या तरी २४ जुलैला हे पत्र पंतप्रधानांच्या घरी पोहोचले होते असा निश्चित पुरावा आहे. समजा, वादासाठी असे गृहीत धरले की, गुप्तहेरखात्याने हे पत्र २५ जुलैला पकडले, तरीही २५ तारखेला पकडलेल्या पत्रावर इतक्या त्वरेने विचार होऊन २५ लाच सातजणांना अटक करण्याचा आदेश तयार झाला असेल, यावर विश्वास बसत नाही. गुप्तहेरखात्याला मध्ये घालून इंदिराजींची अब्रू वाचविण्याचा हा प्रयत्न पूर्ण निष्फळ ठरलेला आहे. यात एक थोडोशी कायदेशीर गंमतही आहे. ज्या दिवशी हे पत्र गुप्तहेरखात्याने पकडले असे सांगण्यात आले, त्या दिवशी तशा प्रकारचे पत्र पकडून त्यातला मजकूर वाचून कारवाई करण्याचा कोणताही अधिकार गुप्तहेरखात्याला नव्हता. मात्र यानंतर आठवडाभराने सरकारने गुप्तहेरखात्याला तसे अधिकार देणारा आदेश काढला व तो मागील प्रकरणांनाही लागू केला. पाताळयंत्री लोक बुद्धीचा वापर किती हीन दर्जाच्या कामासाठी करतात आणि मूल्य जपू पाहणाऱ्या लोकांना कसे पीडतात, त्याचे हे उदाहरण.

'अपराधेविण ते वितंड। भले त्यास करिती दंड।' एवढाच न्याय अशा प्रकरणी उरतो. ◻

## २ : पक्षाच्या कामासाठी सरकारी नोकर.

७ फेब्रुवारी १९७७ रोजी रेडिओ आणि प्रसिद्धी या दोन खात्यांतील २२ कर्मचारी कॉंग्रेस पक्षाच्या इंग्रजी जाहीरनाम्याचे १० भाषांत भाषांतर करण्याच्या जबरदस्त कामाला जुंपण्यात आले. जाहिरातखात्याचे संचालक सेठी यांनी त्या दिवशी आपल्या ११ अधिकाऱ्यांना खास कामासाठी तयार राहण्यास सांगितले. या वेळी सेठी यांचा चेहरा पडलेला होता. सरकारची चाकरी करताना इच्छेविरुद्ध अनेक गोष्टी कराव्या लागतात अशी मखलाशी त्यांनी केली. काम कोणते, किती वेळ लागेल, कोठे करायचे हे सर्व गुप्त होते. सेठींनी सर्वांना बजावले की प्रत्येकाने गुप्ततेची शपथ घेतली आहे आणि या खास कामाची बातमी या कानाची त्या कानाला पोचता कामा नये. मग त्या सर्वांना तीन-मूर्तीजवळ विश्व युवक केंद्रामध्ये नेण्यात आले. १८ पानी इंग्रजी जाहीरनाम्याच्या प्रती तेथे सर्वांना देण्यात आल्या. भाषांतराचे काम संपेपर्यंत बाहेर पडण्यास सक्त मनाई होती. आपण कदाचित उशिरा परतू असे दोन लोकांना घरी निरोप पाठवायचे होते. त्यांना फोन करू देण्यात आले, पण बोलणे चालू असताना दोन अपरिचित धटिंगण शेजारी उभे होते.

रेडिओ वृत्तसेवेचे संचालक भट्ट यांनाही विद्याचरण शुक्लांच्या व्यक्तिगत सहाय्यकांनी फोन करून भाषांतरकारांची मदत देण्यास सांगितले होते. भट्ट यांनी विरोध करून पाहिला; पण त्यांना समजावण्यात आले, की हा मंत्रीमहोदयांचा हुकुम आहे आणि त्याची तामिली झालीच पाहिजे! रेडिओचे ११ लोक ४ च्या सुमारास विश्व युवक केंद्रात पोचले तेव्हा प्रसिद्धिखात्याच्या लोकांनी काम सुरू केलेलेच होते. प्रसिद्धिसंचालक सेठी जातीने अथवा दुसऱ्याकरवी कामावर लक्ष ठेवून होते. काम संपवून लोक बाहेर पडताना प्रत्येकाजवळून कागदाचा लहानसा तुकडाही काळजीपूर्वक काढून घेण्यात आला.

रेडिओ वृत्तसंस्थेचे उपसंचालक मुन्शी यांनी कॉंग्रेस कमिटीचे बावरी यांना काही दिवसांनी जणू बोलण्याच्या ओघात सुचविले की, भाषांतर केलेल्यांना थोडेफार पैसे द्यावेत. १८ पानांच्या पूर्ण भाषांतराला १२५ रुपये देण्याचे ठरले. १० भाषांतरांचे एकूण १२५० रुपये रीतसर पावत्या घेऊन वाटले गेले. यांपैकी काही पावत्या आयोगासमोर सादर करण्यात आल्या. प्रसिद्धी व रेडिओ दोन्ही खात्यांच्या मोटारी या कामात वापरल्या गेल्या, हेही संबंधित नोंदीवरून सिद्ध झाले.

फेब्रुवारी १८ च्या वर्तमानपत्रात या गैरप्रकाराची बातमी फुटली. तेव्हा माहिती आणि नभोवाणी खात्याचे अतिरिक्त सचीव प्रसाद यांनी चौकशी केली. भाषांतराचे काम विद्याचरण शुक्लांच्या हुकुमाने झाले हे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा सारवासारव म्हणून सर्व भाषांतरकर्त्यांकडून 'आम्ही भाषांतर केले नाही,' अशा निवेदनांवर सह्या करून घेण्यास त्यांनी फर्मावले. हा म्हणजे खरोखरच 'नाक दाबून बुक्क्यांचा मार!' सगळ्या बिचाऱ्यांनी तशा सह्या केल्या. आणीबाणीत नकार देऊन सांगतात कुणाला?

विद्याचरण शुक्लांनी याबाबतीत कानांवर हात ठेवले. मला यातील काहीच माहीत नव्हते. एका अधिकाऱ्याने रायपूरला ही बातमी मला दाखविली; पण आधीच खात्यामार्फत चौकशी सुरू असल्यामुळे मी त्यात लक्ष घातले नाही, असा त्यांनी बचाव केला. खात्यातील वरिष्ठ अधिकारी जनता सरकारला खूष करण्यासाठी माझ्याविरुद्ध खोटेनाटे कुभांड रचीत आहेत असा कांगावाही त्यांनी केला. आयोगाच्या मते राज्यातील कर्मचाऱ्यांकडून पक्षाचे काम करून घेण्यात आले ही गोष्ट निःसंशय शाबित झाली आहे. रेडिओ आणि प्रसिद्धी या दोन्ही खात्यांना एकाच वेळी कामाला जुंपणे फक्त केन्द्रीय मंत्री वा उपमंत्री यांनाच शक्य होते. ही दोन खाती वरील बाबतीत आपण होऊन एकमेकांबरोबर सहकार्य करतील हे असंभवनीय आहे.

बातमी फुटल्याचे निदर्शनाला आणल्यानंतर शुक्लांनी काळजी, आश्चर्य वा वैताग कोणतीच भावना दाखविली नाही हे सूचक आहे. त्यांना खरे तर आधीच सर्व कल्पना असणार. शुक्लांची ही सर्व कृती

म्हणजे अधिकाराचा बेलगाम गैरवापर आहे आणि १९५१ च्या लोकप्रतिनिधी कायदा तरतूद १२३(७) अन्वये गुन्हा आहे.

पक्षाच्या व स्वतःच्या निवडणूक-प्रचारासाठी सरकारी कर्मचाऱ्यांकडून पोस्टर्सही बनवून घेण्यात आली. प्रसिद्धिखात्याचे संचालक श्री. सेठी यांनी आपल्या हाताखालील काही चित्रकारांना १३ फेब्रुवारी १९७७ रोजी कचेरीत बोलावून घेतले व विद्याचरण शुक्ला यांच्याकरता काही पोस्टर्स बनविण्याबद्दल तोंडी व लेखी सूचना दिल्या. पुढीलप्रमाणे पाच पोस्टर्स तयार करायची होती—

१. विद्याचरण शुक्ला व इंदिरा गांधी
२. एकटे विद्याचरण शुक्ला
३. शामचरण शुक्ला व इंदिरा गांधी
४. एकटे शामचरण शुक्ला व
५. एकट्या इंदिरा गांधी.

याबाबत सेठींनी दिलेल्या लेखी सूचना आयोगासमोर सादर करण्यात आल्या.

त्याच दिवशी १·३० वाजेपर्यंत बहुतेक काम पूर्ण झाले. मग सूचना मिळाली की, संध्याकाळी ७ रेसकोर्स रोड या विद्याचरण शुक्लांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची पसंती विचारण्यात यावी. त्यांनी काही दुरुस्त्या सुचविल्या. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता दुरुस्त पोस्टर्स प्रसिद्धी-संचालक सेठी यांच्याकडे पोचती करण्यात आली. शुक्लांनी ही पोस्टर्स आपल्या निवडणुकीत वापरली गेल्याचे मान्य केले. ती आपण १३ तारखेला रात्री तपासली व दुरुस्त्या सुचविल्या हेही त्यांनी मान्य केले. त्या वेळी माहिती व नभोवाणी खात्याचे काही अधिकारी तेथे उपस्थित होते हेही कबूल केले; पण पोस्टर्स खात्याच्या कर्मचाऱ्यांनी काढलेली नव्हती, ती काँग्रेस कमिटीने करवून घेतली होती, असा बहाणा केला.

पुढच्या वेळी निवेदनात शुक्ला म्हणाले की, काँग्रेस समितीच्या उपसचिव मार्गारेट अल्वा यांनी ती करवून घेतली होती. आपल्या बाजूने साक्ष देण्यासाठी शुक्ला यांनी श्री. शिक्षार्थी, डुमंडरोड अलाहाबाद यांना बोलविण्याचे ठरविले. ते म्हणे पोस्टर्स तयार करणारे कलाकार! पुढे शुक्लांनी आयोगाला पत्र लिहिले की, कलाकाराच्या नावात गफलत झाली असून मुनिर्का, नवी दिल्ली येथे रहाणारे श्री. युगल शर्मा हेच खरे आपली पोस्टर्स बनविणारे कलाकार. या दोनही नावांचा काँग्रेस कमिटीच्या कागदोपत्री उल्लेख नाही. शुक्लांची पोस्टर्स बनविण्यासाठी आम्ही कोणाला छदामही दिलेला नाही असे काँग्रेस कमिटीच्या हिशेबनिसांनी सांगून टाकले. ते म्हणाले, व्यक्तिगत उमेदवाराकरिता पोस्टर्स बनविण्याची कमिटीची पद्धतच नाही. या सर्व गोंधळावरून उघड दिसते की, श्री. शुक्ला चक्क खोटे बोलत आहेत.

विद्याचरण शुक्ला यांनी सरकारी कारभाराचे मूलभूत संकेत उधळून लावले आहेत व लोकप्रतिनिधी कायदा १९५१ तरतूद १२३(७) अन्वये गुन्हाही केला आहे असे आयोगाचे मत आहे.

□

# ३ : समारोप

आयोगाने अशा तऱ्हेच्या किती तरी गोष्टी तपशिलासह उजेडात आणल्या आहेत. मोक्याच्या जागी लाचार व नालायक लोकांना नेमणे, व्यक्तिगत व पक्षीय स्वार्थासाठी खोट्या कारणांवरून धरपकडी करणे व वशिल्याच्या तट्टांची सर्व बेकायदा कृत्ये चालवून घेणे, एक ना दोन!

आपल्या कारकीर्दीची ही चीरफाड इंदिरा गांधींना गैरसोयीची असल्यामुळे त्यांनी शहा आयोगाविरुद्ध थयथयाट करणे स्वाभाविक आहे; परंतु आयोगाद्वारे शासनाची चौकशी करण्याची प्रथा आपल्याकडे चांगलीच रूढ आहे. १९५३ साली मुंदडा प्रकरणाची छागला आयोगाने चौकशी केली. त्यात अर्थमंत्री कृष्णम्माचारी यांना राजिनामा द्यावा लागला. १९५६ साली सिराजुद्दीन प्रकरणाची चौकशी झाली. त्यात खाणमंत्री मालवीय हाकलले गेले. पंजाबचे मुख्यमंत्री प्रतापसिंग कैरों यांना १९६३ साली चौकशी आयोगामुळे पद सोडावे लागले. बक्षी गुलाम महंमद, बिजू पटनाईक, वीरेन मित्रा यांच्यावरही त्या त्या चौकशी आयोगांनी ठपका ठेवला. उलट इंदिरा गांधींनी मात्र चौकशी आयोगपद्धतीचा उघड पक्षपातीपणे वापर केला. रेल्वेमंत्री ललितनारायण मिश्रा यांचा पाँडीचरी आयात परवाना प्रकरणात हात गुंतला होता तर गुजराथचे मुख्य मंत्री चिमणभाई पटेल यांच्यावर तेलगिरण्यांच्या राष्ट्रीयीकरणाच्या प्रकरणात लाखो रुपये खाल्ल्याचा आरोप होता. आपल्याकडे बॅकबे रेक्लमेशन प्रकरणी वसंतराव नाईक व भाऊसाहेब वर्तक यांच्यावर सरकारचे कोटचवधी रुपयांचे नुकसान केल्याचा आरोप होता; पण बाईंनी चौकशी आयोग नेमण्याला नकार दिला. पुढे आणीबाणीत मात्र पंजाबमध्ये अकालीदल व तामिळनाडूमध्ये द्रमुक या पक्षांनी त्यांच्या धोरणाला विरोध केल्याबरोबर बाईंनी त्यांची चौकशी करण्यासाठी आयोग नेमले.

आता खुद्द बाईंवर चौकशी शेकू लागताच त्या म्हणतात, की ही राजकीय चौकशी आहे, त्यांच्यावर सूड उगविण्यासाठी हा आयोग नेमला गेला आहे. या मल्लीनाथीने कोणी फसणार नाही!

अशा आयोगांचे कामकाज दीर्घकाळ चालते. त्यांच्यावर बराच खर्च येतो म्हणून काही जणांना वाटते की कशाकरिता हा खटाटोप? यातून काही होणार नाही; पण मग पर्याय काय? गैरकृत्याबद्दल काहीच न करणे हे तर बेबंद वागणुकीला आमंत्रणच ठरेल. सरकारी अधिकाऱ्यांकडून चौकशी करून घेतली तर तिच्यावर पक्षपातीपणाचा आरोप येण्याची शक्यता. तसेच इतर अधिकाऱ्यांचा दबाव येण्याचाही संभव जास्त. शिवाय त्यांना सरकारी नियंत्रणाबाहेरील व्यक्तींना बोलावण्याचा व त्यांची जबानी घेण्याचा हक्क नसतो. तसेच कोणतेही दस्तऐवज व कागदपत्र मागता येतातच असे नाही. ह्या सर्व गोष्टी विचारात घेऊन सामाजिक हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या बाबींकरिताच चौकशी आयोग कायद्याची योजना झालेली आहे.

शहा आयोगाने अहवालात मूलभूत आणि गंभीर अशा गोष्टींकडे लक्ष वेधले आहे. शासकीय यंत्रणेतील अत्यंत वरिष्ठ अधिकाऱ्यांचीसुद्धा दडपणाला बळी पडून सत्य—असत्य, योग्य—अयोग्य हा विवेक न करता बेकायदा कृत्यांना सहकार्य करण्याची तयारी, विकास कार्यक्रमांपेक्षा किती तरी पट कार्यक्षमतेने व तत्परतेने फिरलेला दडपशाही वरवंटा, जनमताच्या दबावाचा अंकुश बाजूला जाताच राजकीय कार्यकर्त्यांनी गमावलेली किमान जनहितदृष्टी यांचा काळजीपूर्वक विचार करूनच भविष्यातील समाज व शासनसंघटनेबद्दल मते बनविली पाहिजेत. म्हणूनच अहवालाचा समारोप करताना आयोगाने मुद्दाम नमूद केले आहे की 'ज्यांनी कायदा मोडला त्यांच्यापैकी किती जणांना व किती प्रमाणात शिक्षा होते हे या आयोगाच्या यशाचे गमक असणार नाही, तर परत असे गैरव्यवहार आणि अत्याचार होऊ नयेत यासाठी सरकारी कामकाजपद्धतीत व सरकारी अधिकाऱ्यांच्या मनोवृत्तीत किती प्रमाणात सुधारणा होते यावरच आयोगाच्या श्रमांचे सार्थक झाले की नाही हे ठरणार आहे.' □

रंगभूमी । विनया खडपेकर

# हमिदाबाईची कोठी

## प्रयोग निर्दोष पण लेखनात उणे

हमिदाबाईची कोठी या नाटकाचे लेखक श्री. अनिल बर्वे आहेत आणि दिग्दर्शन विजया मेहता यांनी केलेले आहे.

गुंड-वेश्या यांचे गुन्हेगारी जग. सत्चारित्र्याला सर्वस्वी प्रतिकूल अशा त्या जगात कलेशी, खांसाहेबांशी इमान ठेवून निष्ठावंत हमिदाबाई जगते. तिची तरुण कन्या शब्बो तिच्यासारखीच प्रामाणिक; परंतु शिक्षित, नाचगाणे न जाणणारी अशी आहे. आईच्या प्रामाणिकपणाचा वारसा, शिवाय मिळालेले शिक्षण. यामुळे स्वतःच्या भोवतालच्या जगाशी ती समरस होऊ शकत नाही. 'गाणारणी'ची मुलगी म्हणून पांढरपेशा समाजातही तिला स्थान नाही. कोंडीत सापडलेली शब्बो कोठीचे पावित्र्य राखण्यासाठी धडपडते. त्यातच तिचा अंत होतो. हा या नाटकाचा मुख्य विषय आहे.

हा विषय तीन अंकांतून मांडला आहे. नाटकाचे सर्व कथानक हमिदाबाईच्या कोठीत घडते. भोवती वेश्यावस्ती आहे. त्या वस्तीत हमिदाबाईची कोठी वेगळी आहे. हमिदाबाई स्वतः धर्मशील, कलेची उपासना करणारी आहे. तिची कन्या शब्बो हॉस्टेलवर शिकते आहे. अनाथ सत्तार आणि सईदा यांचा हमिदाबाई सांभाळ करते. सत्तारला सारंगी शिकविते. सईदाला शास्त्रीय संगीत शिकविते. तिच्या कोठीत देहविक्रय होत नाही. केवळ नृत्य आणि गायन. फिल्मी संगीतालाही येथे मज्जाव आहे. दिवस पालटले आहेत. फिल्मी संगीताला भाव आहे; पण हमिदाबाई हट्टाने आपले व्रत चालवते. पैसे मिळत नाहीत. फी भरणे शक्य नाही म्हणून मुलगी शब्बो शिक्षण सोडून घरी-कोठीवर परत येते. तिने या घाणेरड्या वस्तीत राहू नये असे हमिदाबाईला फार वाटते; पण इलाज नसतो. हमिदाबाईला अधेमधे मदत करणारे खांसाहेब मरण पावतात. त्यांच्या निधनामुळे हमिदाबाईच्या कोठीत काही काल गाणेबजावणे बंद असे जाहीर करते. नेमके याच वेळी भरपूर पैसे देणारे गिऱ्हाईक येणार असते; पण हमिदाबाई ऐकत नाही. सईदा भांडून जैतूनकडे वेश्या म्हणून निघून जाते. खांसाहेबांविषयी माहिती विचारण्याच्या निमित्ताने रेडिओचा बाबुजी कोठीत येतो. शब्बो—बाबूजी ओळख वाढत जाते. दरम्यान हमिदाबाईचे दुखणे जोर धरते. यातच तिला मृत्यू येतो. शब्बो बाबुजीशी विवाह करण्याचे स्वप्न पहात दिवस घालवू लागते. सईदा तिच्या डोळ्यांत अंजन घालते. बाबूजी तुझ्याशी लग्न करणार नाही. तुला लुक्काशीच लग्न करावे लागेल असे ठासून सांगते. तिची भविष्यवाणी खरी ठरते. बाबूजी माघार घेतो. शब्बो संरक्षणासाठी लुक्काशी विवाह करते. गुंड असला तरी मनाचा दिलदार असलेला लुक्का शब्बोशी चांगला वागतो. कोठीत दारू पीत नाही. शब्बोच्या प्रेमाखातर सईदाच्या अंत्यविधीचा खर्च करतो; पण दैव फिरते. लुक्काला शेराला सव्वाशेर भेटतो. त्याची मोहल्ल्यातली वट संपते. तो दरिद्री होतो. मनाला यातना होत असताना शब्बोला पैशासाठी धंद्याला लावायचे ठरवितो. 'थोडे दिवस! थोडे दिवस! पैसे फिटेपर्यंत' अशी स्वतःची आणि शब्बोची समजूत घालीत तिला धंद्याचे कपडे देतो. 'हे नकोत. माझ्या अम्मीने ठेवले आहेत माझ्यासाठी कपडे तेच घालते.' असे म्हणून शब्बो आत जाते. कडी लावते. स्वतःला जाळून घेते. बाहेरून अगतिकपणे लुक्का पंटर ओरडत दाराला धक्के देत असतात. येथे नाटक संपते.

हे नाटक कथानकप्रधान आहे. हमिदाबाईच्या कोठीत कोणकोणत्या घटना घडत जातात याला येथे महत्त्व आहे. कोठी 'पाक' ठेवण्यासाठी झटणाऱ्या शब्बोचा अंत या उद्दिष्टाकडे सर्व घटनांची वाटचाल होणे आवश्यक आहे; परंतु तसे झालेले नाही. वेश्यावस्तीचे, गुंडाचे राज्य असणाऱ्या मोहल्ल्याचे चित्र दाखविण्यात लेखक गुंतून पडला आहे त्यामुळे लुक्काचे राज्य, त्याचे हप्ते मागायला येणे, पोलिसांचे हप्ते, या वस्तीत पोलिस हिफाजत करीत नाहीत तर लुक्कासारखे गुंड करतात असे चित्र एका बाजूला दाखविण्यात आले आहे, तर दुसऱ्या बाजूला वेश्यावस्तीतली मुलगी पांढरपेशा समाजात वाढल्याने काय होते ते दाखविले आहे. पांढरपेशांच्या संस्कारांमुळे शब्बोची स्वतःच्या जगात कुंचबणा होते. तेथे ती समरस होऊ शकत नाही आणि तिच्या पार्श्वभूमीमुळे पांढरपेशा समाज तिला आपल्यात सामावून घेत नाही. त्यातच कोठी दारूगुत्त्याला, वेश्याव्यवसायाला न विकण्याचे तिचे ध्येय यातून तिची शोकांतिका होते. या दोन चित्रांत कलात्मक एकरूपता नाही. शब्बोच्या कथानकाच्या संदर्भात गुंडाच्या मोहल्ल्याचे चित्र पार्श्वभूमी म्हणून यायला हवे होते. ते पार्श्वभूमी म्हणून न राहता मध्येच नाटकाचा कब्जा घेते. समजा, वस्तीचे चित्रच प्रामुख्याने दाखवायचे असते तर शब्बोच्या चित्रात रंग भरणाऱ्या आकृतींपैकी एक म्हणून कोठे तरी बाजूला हवी होती. ती मधेमधे एकसारखी केंद्रस्थानी येते. यामुळे एकंदर नाटयकृतीचा तोल बिघडतो.

जे सामाजिक विचार व्यक्त करायचे आहेत ते लेखकाने नाटकाच्या कथानकात घुसडून दिले आहेत. 'पांढरपेशा समाज हा खोटी प्रतिष्ठा मिरविणारा आणि गुंड-मवाली तेवढे सच्चे' हा आजच्या जमान्यातला आवडता, बुळबुळीत विचार या नाटकात आवेशाने मांडला आहे. त्यासाठी सत्तार-सईदा, बाबूजी-शब्बो ही प्रेमप्रकरणे व लुक्का-शब्बो विवाहजीवन रेखाटले आहे. स्वतःच्या संसाराचे स्वप्न पुरे करण्यासाठी खेड्यातल्या गरीब मुलीला वेश्येला विकणाऱ्या सत्तारकडे श्री. अनिल बर्वे सहानुभूतीने पहातात, परंतु ती सहानुभूती परिस्थितीच्या कोंडीत सापडलेल्या बाबूजीच्या वाट्याला आली

नाही. त्याच्याकडे कुत्सितपणे पाहिले जाते स्वतःच्या संसाराला पैसे उभारण्यासाठी सत्तारला मनात नसतानाही एक गरीब मुलगी वेश्येला विकणे भाग आहे, तितकेच बाबूजीला मनात नसतांना स्वतःच्या आई-बहिणींसाठी शब्बोला सोडणे भाग आहे. दोन समाजाची जीवनमूल्ये फक्त वेगळी. स्वार्थ दोघेही पहातातच. स्वार्थासाठी अनाथ, गरीब मुलगी वेश्येला विकणे सत्तारच्या समाजाला मंजूर आहे. म्हणून सुखी होण्यासाठी त्याने तो मार्ग पत्करला. (तो कैदेत गेला याचे कारण प्रेक्षकांची सहानुभूती त्याच्या बाजूस खेचायची आहे. एरवी असे गुन्हे करणारे कित्येकजण सुटतातच) प्रेम असून गाणारणीच्या मुलीला सोडून देणे बाबूजीच्या समाजाला मंजूर आहेच. ते बाबूजी करतो. मग सत्तार बरोबर आणि बाबूजी चूक असे का ? बाबूजीला आणखी खाली खेचण्यासाठी आणि गुंडांचे उदार हृदय दाखविण्यासाठी लुक्काचे उदात्तीकरण केले आहे. आधी केवळ वासनेने शब्बोवर नजर ठेवणारा लुक्का नंतर अचानक तिच्यावर खरेखुरे प्रेम करू लागतो.

या साचेबंद विचारसरणीमुळे व्यक्तिरेखाटन अतिशय ढोबळ झाले आहे. सगळी पात्रे एकसूरी वाटतात. हमिदाबाई वेश्यावस्तीतली टिपिकल प्रामाणिक कलावंतीण. लुक्का दिलदार मनाचा असंस्कृत गुंड. शब्बो सगळ्या बाजूंनी गुणाची पोर ! सत्तार सत्प्रवृत्त पण परिस्थितीने नाडलेला. बाबूजी सुशिक्षित, स्वार्थी, भेकड. पंटर वारा वाहील तशी पाठ फिरवणारा. सईदा तेवढी हाडामासाची स्त्री वाटते. तिचे संतापणे, पोटासाठी वेश्येचा धंदा करणे, सत्तारसाठी सर्वस्व पणाला लावून मरण पत्करणे यातून एक तडफदार चित्तवेधक व्यक्तिमत्त्व उभे राहिले आहे

सईदाचा रियाझ. तिचा फिल्मी गायनाचा प्रयत्न, सत्तार–सईदाचे संसार–स्वप्न हा भाग मुख्य नाट्यविषयाशी एकरूप होत नाही. अलग तुकडे वाटतात. यामुळे नाटकाची गती अतिशय संथ होते. केवळ दोन अंकांचा जीव असलेले कथानक ताणून तीन अंकी केले असल्यामुळे पुष्कळ ठिकाणी कंटाळवाणे होते. काही विनोद बऱ्यापैकी आहेत.

या नाटकाचा प्रयोग ठाकठीक होतो. हमिदाबाईची कोठी योग्य रीतीने दाखविण्यात आली आहे. खिडक्यांच्या कमानी, एका बाजूस असलेली बिछायत, पिकदाणी यावरून ही एका नाचगाणे करणाऱ्या स्त्रीची खोली आहे हे सहज लक्षात येते. कोणताही भपका नसल्यामुळे ही कोठी इतर नाचणाऱ्या स्त्रियांपेक्षा वेगळ्या स्त्रीची आहे हेही कळते. मागच्या बाजूच्या कमानीतून पलीकडे दिसणाऱ्या बकाल गिचमिड वस्तीचे चित्रही जाणवते. पडदा उघडण्यापूर्वी नाटकाच्या सुरुवातीलाच ऐकू येणाऱ्या वेगवेगळ्या रागदारीतून कोठीच्या वातावरणाची थोडीफार कल्पना येते. खांसाहेबांविषयीच्या मुलाखतीत त्यांच्या चिजा गाऊन दाखविताना हमिदाबाई जे सूर किनऱ्या आवाजात आळवीत असते तेच सूर पार्श्वसंगीतात खूप मोठ्याने वाजवून तो जुना आवाज तिच्या कानात घुमतो आहे असे दाखविण्याचा परिणाम साधला आहे. फारशा तांत्रिक कसरती न करता मनातली खळबळ दाखविण्याचे दिग्दर्शिक आणि अभिनेत्री म्हणून विजया मेहतांचे सामर्थ्य अप्रतिम आहे. सर्वच पात्रांची वेषभूषा, केशभूषा, रंगभूषा आपापल्या भूमिकेशी योग्य आहे. सर्वांनी आपापल्या भूमिका समरसून केल्या आहेत. हमिदाबाईंची भूमिका विजया मेहता यांच्या आतापर्यंतच्या विविध भूमिकेतील आणखी एक वेगळी भूमिका. या भूमिकेला एकंदर नाटकात वाव फार कमी आहे; परंतु जो काही वाव आहे. त्यातही त्यांचे नेहमीचे अभिनयसामर्थ्य प्रकट झाले नाही. त्यांच्या वाट्याला आलेल्या उर्दुमिश्रित वाक्यांमुळे की काय कोण जाणे ! मागे सुमारे सात आठ वर्षांपूर्वी विजया मेहता यांना 'मना सज्जना' या फार्समध्ये रखेलीच्या भूमिकेत पाहिले होते. रंगेल परंतु नऊ वारी नेसणारी थोडी थिल्लर पण आपल्या यजमानाच्या अगदी आज्ञेत असलेली बालगंधर्वांच्या गाण्याचे वेड असलेली विजया मेहतांनी उभी केलेली ती रखेली विसरणे अगदी अशक्य आहे. त्या तुलनेने हमिदाबाई फारच फिकी एक रंगी ! इतर सर्व कलाकार दिलीप कोल्हटकर (बाहरवाला) प्रदीप वेलणकर (बाबूजी) जनार्दन परब (पंटर) निना जोशी (शब्बो) अशोक सराफ (लुक्का) यांनी आपापल्या भूमिका चोखपणे पार पाडल्या आहेत. विशेष लक्षात रहातात नाना पाटेकर (सत्तार) आणि भारती आचरेकर (सईदा). सईदापुढे बगबग करणारा आणि हमिदाबाईपुढे आदरयुक्त भीतीने गप्प रहाणारा, हमिदाबाईचे पाय चेपणारा, शब्बोचे रक्षण करणारा, स्वतःच्या संसाराचे स्वप्न पहाणारा, पोलीस मागे लागल्यावर घाबरणारा सत्तार उभा करण्यात नाना पाटेकर यशस्वी झाले आहेत. तडकफडक बोलणारी, हमिदाबाईवर माया करणारी; पण भुकेल्या पोटामुळे तिच्याशी भांडणारी सईदा भारती आचरेकर यांनी मूर्तिमंत साकार केली आहे.

'हमिदाबाईची कोठी' या नावावरून कोठी या वास्तूला नाटकात महत्त्व आहे असे वाटते. तसे ते थोडे फार आहेही. तरी ही कोठी स्वतःचे व्यक्तिमत्त्व घेऊन नाटकात आली आहे असे वाटत नाही. त्या कोठीत वावरणाऱ्या माणसांची त्या वास्तूशी एकजीवता प्रेक्षकांना जाऊन भिडतच नाही. त्यामुळे कोठीला व्यक्तिमत्त्व येत नाही.

लेखनात काही जागी ठिसूळ असल्यामुळे प्रयोग कितीही परिश्रमपूर्वक केला तरीही न सावरलेले हे नाटक आहे. प्रयोग निर्दोष असूनही हे नाटक प्रेक्षकांना आपल्याबरोबर वाहून नेऊ शकत नाही. ❊

# मुंबईचे कावळे

## नवतंत्राच्या झिंडीतले सामान्य नाटक

'मुंबईचे कावळे' या नाटकाचे लेखक श्री. शफाअत खान असून दिग्दर्शक श्री. रवींद्र दिवेकर आहेत.

काही गावांची वादळ आणि पूर यामुळे वाताहत होते. दोन पक्षांचे कार्यकर्ते तेथील पीडित लोकांना मदत करण्यासाठी, पुनर्वसनासाठी जातात. ते तेथे कोणतेच कार्य करीत नाहीत, करू इच्छित नाहीत, करू शकतही नाहीत. त्यांच्या जाण्यातून काहीच

निष्पन्न होत नाही हा या नाटकाचा मुख्य विषय आहे.

हा विषय एका प्रहसनातून मांडला आहे. सुरवातीला 'प्रायोगिक नाटक' या विषयावर थोडी मल्लीनाथी आहे. प्रायोगिक म्हणजे काय स्टेज प्रॉपर्टी नाही–खूप तीस–चाळीस पात्रे असतात वगैरे सांगून आमचे नाटक थोडे वेगळे आहे असे सूचित केले आहे. नंतर लोकनाट्याप्रमाणे ढोलक्याच्या साथीत 'गण' होतो. आता मावशी नाही, गवळणी नाहीत असे सांगून 'मुंबईचे कावळे' सुरू होते. मग जे दाखविले जाते ते शाळकरी मुलांनी चुटके सादर करावेत त्या स्वरूपाचे आहे.

कार्यकर्ते दोन पक्षांचे असल्यामुळे दोघांत मतभेद होतात. कार्य रहाते बाजूला आणि एकमेकांच्या पक्षावर ते आग पाखडू लागतात. मध्येच थोडे काम करतात; पण तेही मूर्खपणाचे वितंडवाद करीतच !... मेलेले गाढव कोण होते ? हिंदु की मुसलमान ?...एक हात सापडला. दुसऱ्या बाजूला पडलेल्या शरीराचा तो असावा. मग हाताच्या खुणा कोणत्या ? हातावर केस आहेत... पिंडाला शिवायला कावळे हवेत. ते गावात नाहीत. कावळे मुंबईहून आणताना होणारी गंमत...अशा प्रसंगांतून कार्यकर्त्यांना हास्यास्पद बनविले आहे. शिवाय लोकांचा कर्मठपणा, त्या विपत्कालीही लोकांनी पिंडदानविधीला दिलेले महत्त्व यावरही टीका आहे.

वादळ, पूर यामुळे गावेच्या गावे वाहून गेल्याची भीषण घटना–त्या घटनेचा फायदा उठविण्याचा राजकीय पक्षांचा स्वार्थ, विपत्काली कर्मकांडे कसोशीने पाळणारी माणसे हा विडंबननाट्याला अतिशय पोषक विषय आहे; परंतु या विडंबनाचे नाटकातील स्वरूप अतिशय उथळ आणि कृत्रिम आहे. प्रेक्षक कोठे हसतात, कोठे गुंगतात याचे ठोकताळे लक्षात घेऊन प्रहसन रचले आहे. त्यासाठी काही क्लृप्त्या योजल्या आहेत. प्रेक्षकांना हसविण्यासाठी 'अरे, भूत महाराष्ट्रीय दिसत आहे,' 'हा माणूस ब्राह्मण, कारण मडक्यावर धराण्याचा ध्वज शेंडी दिसते आहे.' अशा प्रकारचे विनोद मधेमधे विखरून दिले आहेत. मुंबईला फोनवर होणारे संभाषण, एकाच वेळी चार–चार आवाज ऐकू येणे, शब्द स्पष्ट न कळल्यामुळे होणारा गोंधळ बऱ्यापैकी करमणूक करून प्रेक्षकांना गुंगवितो.

अशा प्रकारच्या कृत्रिम रचनेमुळे 'कलाकृती' जन्मच घेऊ शकली नाही. नाटकाचा प्रयोग तर अगदीच सुमार होतो. कोणतीही सामग्री न घेता नवतंत्राने प्रयोग सादर होतो. ढोलक्याच्या साथीवर 'गण' आणि एक–दोन गाणी गायली आहेत. एकंदर प्रहसनाची प्रकृती लक्षात घेता या गायनाची बिलकुल आवश्यकता वाटत नाही. 'गवळण' चर्चाही अस्थानी वाटते. नाटक ज्या व्यक्ती सादर करतात त्यांना अभिनय, भूमिकेशी समरसता म्हणजे काय याची यत्किंचितही जाणीव नाही. विडंबनाला आवश्यक अशी शब्दांची फेक नाही. केवळ अंगविक्षेप करीत नाटक सादर केले जाते.

नाटकाचे नाव 'मुंबईचे कावळे' दोन अर्थांनी योग्य ठरते. पहिले म्हणजे मुंबईहून पूरपीडित गावात कावळे येणे या घटनेला प्रहसनात महत्त्व आहे. दुसरे म्हणजे ते दोन कार्यकर्ते जसे मुंबईहून आलेले काहीच काम न करता नुसती कावकाव करणारे कावळे आहेत.

कोणतीच कलात्मक जाणीव नसलेले हे निःसत्त्व प्रहसन नवतंत्राच्या दिंडीतील असल्यामुळे काही काल तगू शकेल. ☐

# पत्रकारांचा मेळावा, नाशिक : पृष्ठ २ वरून

विणारे लिखाण करण्यास मनाई आहे. लिंगपिसाट लिखाणावर बंदी आहे. गैरकारभारावर वाजवी टीका करण्यास वृत्तपत्रे उत्तेजन देतात; परंतु ही टीका दोष दूर करण्यासाठी असावी. द्वेषमूलक नसावी असा आग्रह असतो.'

हे सर्व वाचून लालभाईंचे सामर्थ्य फारच आहे असे वाटू लागले. रशियाप्रमाणेच इतर छोट्यामोठ्या राष्ट्रांत वृत्तपत्रांना बरे दिवस असावेत असा समज झाला. इटलीमध्ये दैनिक अवांती आणि इल टेंपो ह्यांचा खप १३ आणि २४ लाखांच्या घरात आहे. इस्रायलमध्ये 'अर्तेझ' ह्या प्रमुख दैनिकाचा खप १ लक्ष आहे. जर्मनीत 'बर्लीन एको' हे लोकप्रिय दैनिक आहे. अमेरिकेत 'डेली न्यूज'चा खप ३१,०२,६५५ एवढा आहे. लंडनमधील तीन प्रमुख वृत्तपत्रांचा खप–'दि ऑब्झर्वर' ६,९८,९२७ 'संडे टाइम्स' १३,६३,२८१, 'संडे एक्सप्रेस' ३६,४२,६७४ असा आहे तर पाकिस्तानमधून 'डॉन' नावाचे गुजराती वृत्तपत्र निघते ह्याची माहिती प्रदर्शन बघताना मिळाली. संपूर्ण प्रदर्शनाच्या शेवटी भारतीय वृत्तपत्रांविषयी एकच वाक्य लिहिले होते. 'आसाही जिम्बु' ह्या एका दैनिकाचा खप भारतातील सर्व दैनिकांच्या खपापेक्षा जास्त आहे. चकावून टाकणारे हे प्रदर्शन पाहिल्यावर एकच गोष्ट खटकली. आणीबाणीशी ज्या वृत्तपत्रांनी लढत दिली त्याविषयी निदान एखादे स्वतंत्र दालन असावयास पाहिजे होते असे वाटले. भरत राऊत आणि संजय चव्हाण ह्या दोन पोरांनी मोठ्या कष्टाने प्रदर्शन उभारल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे !

प्रदर्शनाच्या फेऱ्यातून सुटका झाली आणि पुढील कार्यक्रमाची सूचना मिळाली. सर्व पत्रकारबंधूंनी सभागृहात हजर रहावे, गावात जाऊ नये ! 'मराठी पत्रकारितेत दलितांचे स्थान' ह्या विषयावरील परिसंवादास सुरुवात होणार आहे, सर्वांनी हजर रहावे. अशी सूचना कानांवर पडत असतानाच कुणी तरी पत्रक हातात कोंबले. नारायण गजानन आठवलेंनी 'मराठी पत्रकारितेत दलितांचे स्थान' ह्यावर लिहिलेले ते टिपण होते. आठवल्यांचे टिपण म्हणजे त्यात मसाला असणारच असे गृहीत धरले होते. मुद्दे टिपण्यास कागद न आणणाऱ्या पत्रकारांनी ४–५ पत्रके घेऊन ठेवली. म्हणजे आठवल्यांच्या टिपणाच्या मागच्या बाजूने लिहिता येईल म्हणून. परिसंवादाचे संचलन भोंगळ होते. प्रथम नारायण आठवले बोलायला उठले. आपण प्रक्षोभक बोलणार आहोत असे स्वतःच त्यांनी जाहीर केले. त्यांच्या टिपणातीलच काही मुद्दे त्यांनी मांडले. 'इतर जातींचे लोक बुद्धिबलाने ब्राह्मणांइतके चांगले

होण्यास अथवा ब्राह्मण इतर जातींचे लोकां· इतके अप्रबुद्ध होण्यास युगेच्या युगे लोटली पाहिजेत !' ह्या ब्राह्मणी विधानाचा त्यांनी खरपूस समाचार घेतला. मराठी पत्रकारितेत दलितांचे स्थान काय? ह्यावर अधिक खोलात जाऊन त्यांनी स्पष्ट केले की, की, 'स्थान शोधायला आपण निघतो तेव्हा आंबेडकरजयंतीच्या व पुण्यतिथीच्या दिवशी कुणा कांबळे, खोब्रागडे, मानेचा, बाबासाहेबांवरचा लेख आणि गवईबंधूंचे डोळे फोडल्यावर अथवा दलितांना जिवंत जाळल्यावर कुणा दलिताने फोडलेला टाहो एवढेच हाताला लागते. वृत्तपत्रांच्या संपादकीय खात्यात दलितांना आजही प्रवेश नाही सगळचा मोठचा वर्तमानमत्रांत संपादकीय खात्यात गेल्या ३० वर्षांत दर वर्तमानपत्री एक. सुद्धा दलित घेतला गेलेला नाही. दलितांसाठी अनुभवाचा बाऊ केला जातो; पण अनुभव नसलेला भट-ब्राह्मण रोह्या-रत्नागिरीतून चटकन पत्रकार बनून जातो !' आठवले प्रक्षोभक नसलेले आपले मुद्दे ओढूनताणून प्रक्षोभक बनविण्याचा जणू प्रयत्न करीत होते. त्यांच्या टिपणातील फक्त शेवटचा मुद्दा महत्त्वाचा वाटतो. आठवले लिहितात, 'एखादा बाबा आढाव एक पाणवठाआंदोलन उभे करतो; पण या आंदोलनाला प्रेरक अशी मनोभूमिका बनविण्यासाठी आपली लेखणी राबविण्याची इच्छा किती भट-संपादकांना होते? पाणवठाआंदोलन वाढते आहे तेव्हा छापा त्या कार्यक्रमाचा वृत्तांत अथवा बाबा आढावचा लेख हा व्यवहार झाला. हे आंदोलन समाजाला भिडावे म्हणून कुठल्या वर्तमानपत्राने जनमानस घडविण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे? पाणवठ्याचा ठेका फक्त साधनेनी घ्यायचा? मराठी वृत्तपत्रे दलितांना अस्पृश्य मानून आपले दरवाजे बंद ठेवतातच; पण दलितांच्या प्रश्नावरही तटस्थतेने डोळे झाकून गप्प बसतात हे सत्य आहे. मराठी पत्रकारितेत दलितांनी आपला महारवाडा आपल्या बळावर सजवावा अशीच मराठी वृत्तपत्रांतल्या भटांची भावना दिसते आणि ही भावना बदलत नाही तोवर समाज एकरूप होईल असे मला वाटत नाही. आठवले खाली बसता बसता अशाने 'दलितस्थान' निर्माण होईल व आपण सर्व 'गांडुळे' आहोत असे म्हणतात व टाळ्या घेतात.

त्यानंतर जळगावचे त्र्यं. कृ. कुलकर्णी बोलायला उठतात. महात्मा फुल्यांच्यानंतर दलितांविषयी आपल्यालाच कळविला आहे हे भासविण्यासाठी आठवले बोलले असावेत असे मला वाटते, असे म्हणून ते चर्चा रंगात आणतात. दलितांचे प्रश्न हे आर्थिक आहेत असा वर्गीय दृष्टिकोन ते मांडतात. दलित तरुणांना विविध व्यावसायिक योजनांची माहिती पुरविणे आवश्यक आहे. एखाद्या सवर्णाला उद्योग जमत असेल तर दलित लगेच बोंब मारतात ह्याचे ते एक उदाहरण देऊन वातावरण तापवितात. त्यांचा कोणताच मुद्दा पटण्यासारखा नसतो.

सामाजिक अभिसरणात सुसूत्रता आणली पाहिजे हा कुलकर्णींचा मुद्दा उचलून नाशिकच्या 'वर्गवर्णलढा' ह्या पाक्षिकाचे संपादक श्री. संघसेन आहिरे बोलायला उभे राहतात. मी स्वतः दलित पत्रकार असून पँथरचा कार्यकर्ता आहे असे सांगताच सर्वांच्या पोटात भीतीचा गोळा उठतो. आहिरे पोटतिडकीने बोलतात, पण त्यात सुसूत्रता नसते. आमच्या व्यथा व्यक्त करण्यासाठी आमच्याजवळ साधन नाही. प्रस्थापित संपादक आमचा आवाज दाबून टाकतात. आम्हाला वाघाच्या डरकाळ्या फोडायच्या असतात, परंतु ह्या डरकाळ्यांना तुमचे संपादक उंदराच्या आवाजाप्रमाणे करून टाकतात. आमच्या आया-बहिणींवर अत्याचार झाले की तुम्हाला वाचनीय मजकूर मिळतो म्हणून तुम्ही ते छापता हे आमचे पत्रकारितेतील स्थान! तुमच्याआमच्यात काही फरक नाही. तुमच्यातील बेअक्कल संपादक होऊ शकतात. आपण एकटेच दलित आहोत व समोर बसलेले सर्व जानवे घातलेले 'कडु बामन' आहेत अशा थाटात श्री. आहिरे तुपले-आपले करून मुद्दे मांडीत राहतात. मार्क्सवाद अधिक आंबेडकरवादाने दलितांचे प्रश्न सुटू शकतील असेही ते म्हणतात. दलितांना वृत्तपत्रात स्थान मिळावे यासाठी त्यांच्या काही मागण्या ते मांडतात. सरकारने जिल्ह्याच्या ठिकाणी खाजगी मार्केटच्या दराच्या निम्म्या दराने छपाई वगैरेचा खर्च घेऊन (सरकारच्या खास वृत्तपत्रीय छापखान्यांतून जसे नोटांसाठी छापखाने आहेत तसे) छापून देण्याची लोकशाही व्यवस्था करावी अशी एक मागणी करून श्री. आहिरे खाली बसतात.

'तरुण भारत'चे दिल्लीचे प्रतिनिधी मो. ग. तपस्वी माईक हातात घेतात. अत्यंत धीरगंभीर आवाजात 'दलित' शब्दाची ते व्याख्या सांगतात. इथे दलित शब्द अर्थवाचक आहे, जातिवाचक नाही हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे. दलितांच्या नावावर ओरड करणे व ही फॅशन झालेली आहे आणि काय हो! तुम्ही दलित, दलित म्हणता! मग १९४८ साली महात्मा गांधींचा खून झाला तेव्हा दलित कोण होते? महाराष्ट्रात साखर कारखान्यांची लॉबी वाढल्यावर दलित कोण आहे? तपस्वी हळूहळू आपला संघीय विचार प्रसवतात. संघर्ष-विद्वेष ह्यांनी समाज टिकत नसतो. दलितांसाठी रचनात्मक कार्य चालू आहे ह्याची जाणीव किती मराठी पत्रकारांना आहे? त्यांच्या ह्या प्रश्नाला मागून उत्तर येते 'देवरसांना विचारून सांगतो!' पण तपस्वी आठवल्यांनी फुटीर राष्ट्रवादाची जी कल्पना इथे मांडली आहे ती चिंतनीच आहे... ममता असल्याशिवाय समता येणार नाही. जयहिंद!' असे म्हणत तपस्वी आपले भाषण संपवितात.

रंगा वैद्य बोलायला उठतात तेव्हा वातावरण गंभीर बनते. आठवल्यांच्या प्रक्षोभक टिपणामागील पोटतिडिक ध्यानात घ्या असे सांगत व्यवस्थितपणे १० मिनिटांच्या भाषणात १७ वेळा 'उदात्तीकरण' हा शब्द वापरून ते खाली बसतात.

शेवटी समारोपाला पु. रा. बेहरे उठतात. अगदी लहान मुलांना गोष्टी समजावून द्याव्यात अशा भाषेत बोलायला सुरुवात करतात. दलितांवर सध्या अत्याचार का होत आहेत? ह्याचे जे विश्लेषण बेहरे करतात ते ऐकल्यावर तमाम राजकीय-सामाजिक निरीक्षकांनी बेहऱ्यांचे शिष्यत्व पत्करावे असे वाटले. पु. रा. बेहरे ह्या ज्येष्ठ पत्रकारांनी सांगितले, 'आणीबाणीत २० कलमी कार्यक्रम फारच परिणामकारकरीत्या राबविला गेला. अहो! किती दलितांना-भूमिहीनांना जमीन वाटण्यात आली होती. आणीबाणी गेली. ज्यांच्या जमिनी काढून घेऊन गरीब बिचाऱ्या दलितांना देण्यात आल्या होत्या ते सर्व आता माजतले! चक्क जबरदस्तीने दलितांकडून

जमिनी काढून घेत आहेत. यामुळे काय झाले? साहजिकच संघर्ष वाढला आहे. अत्याचार सुरू झाले आहेत. अजून दोन-चार मुद्दे मांडून ते परिसंवाद संपवितात. मराठवाड्यातील व ग्रामीण वृत्तपत्रांची कामे करणारी पत्रकार–मंडळी बोलू न दिल्यामुळे चिडलेली असतात. पुण्या–मुंबईच्या लोकांना काय दलितसमस्या कळतात? जेव्हा प्रेसवर मोर्चे येतात तेव्हा दलित वगैरे समजेल. एक मराठवाड्यातील पत्रकार आपली प्रतिक्रिया नोंदवितात. दलितांना खरेच स्थान आहे की नाही? त्यावर उपाय काय? ह्याचा विचार न करता परिसंवादाचे सूप वाजते. रात्रीचे ८ वाजून गेलेले असतात. भोजनासाठी पत्रकार पळत सुटतात!

दिवसभर जेवणासाठी आसुसलेल्या पत्रकारांची ताटावर जाऊन बसण्याची धडपड पाहून वाईट वाटले. व्यवस्थेची अडचण लक्षात न घेता संयोजन–भोजनसमितिवाल्यांशी प्रत्येकजण भांडत होता. अहो! अजून किती वेळ थांबायचे! नुसते ताटच खायचे असेल तर तसे सांगा! एका पुण्याच्या पत्रकाराने तर वाढप्याचा गळाच पकडला! जेवण मात्र चांगले होते. अगोदर पांढरा भात, नंतर मसाला भात, छान फुगलेल्या पुऱ्या, ३–४ भाज्या व सर्वांत कहर म्हणजे बासुंदी! एवढ्या मोठ्या प्रमाणावर बासुंदीचे जेवण केले जाते म्हणजे काय? बरे, बासुंदी सुद्धा वाट्टेल तेवढी प्या आणि घट्ट! बहुतेक सर्व गोरगरिबांच्या कल्याणार्थ झटणाऱ्या पत्रकारांनी तृप्तीने ढेकरा दिल्या! रात्री कोणी तरी माहिती दिली की आजचे जेवण महाराष्ट्र सरकारतर्फे दिले गेले! दर्डाजी, त्रिपाठी, वसंतदादा या सर्वांना पाहुणे म्हणून काय उगाच बोलावले वाटते!

रात्री निवासस्थानात गाद्यांवरून भांडणे व्हायला सुरुवात झाली. जे पत्रकार ४–५ च्या ग्रुपनी आले त्यांचे ठीक होते; पण रात्री एकट्यादुकट्या आलेल्यांना कोणी खोलीत घ्यायलाच तयार होईनात! तुम्ही कुठले? नांदेडचे? मग खालच्या मजल्यावर जा! आमच्या खोलीत तुम्हाला जागा नाही! अशी संभाषणे सुरू झाली. बाहेर गाद्या घेऊन झोपलेले पाणी प्यायला गेले की गाद्या गायब! एकूण बासुंदी प्रत्येकाला चढत असल्याचे दिसत होते. रात्री १२–१ च्या सुमारास तीन–चार खोल्यांतून हास्यकल्लोळ सुरू झाला. बाहेरच्या मैदानातून २–३ जणांना चक्क उचलून गुपचूपपणे आणले जात होते. रांजणावर ठेवलेले ग्लासेस बऱ्याच खोल्यातून वापरले जात होते. सर्वांत कहर झाला म्हणजे पाणी प्यायला ग्लास तोंडाला लावताच पाणी कडवट व वास मारायला लागले. मला लगेच संशय याला. रांजणात हात घातला. चक्क हेवर्डसची रिकामी बाटली निघाली! आचारसंहितेवर बोलणाऱ्या सर्व पत्रकारांचे चेहरे आठवले. हा प्रकार जेव्हा एका सिनियर पत्रकाराला सांगितला तेव्हा महाशय म्हणाले, 'अरे, चार बुद्धिवंत जमल्यावर हे चालणारच! तू अजून नवशिका दिसतोयस!'

## दिनांक १० जून

हनुमानस्तोत्र कानावर पडून जाग आली. आंघोळी, दाढ्या करून पत्रकारमंडळी चहाला जाण्यासाठी हजर! दोन चहा आणि नाश्ता घेण्यासाठी पुन्हा हाणामारीस प्रारंभ झाला. पिण्यास पाणी नव्हते म्हणून आरडाओरड सुरू झाली. ह्या ठिकाणी गंमतच झाली. धुळ्याचे पत्रकार भाई मदाने आपल्या परिवारासह चहाची वाट पहात बसले होते. त्यांना पाणी पाहिजे होते. त्यांना कोणी तरी लहान मुलाने पाणी आणून दिले. त्यात कचरा निघाला. मदानेसाहेब म्हणाले, पाण्यात कचरा कसा? त्या पोरानं उत्तर दिले, 'साहेब, काल वादळ झाले म्हणून!' मग काय मदान्यांचा पारा वर चढला. ताड–ताड–ताड त्यांनी सारे कॅंटिन डोक्यावर घेतले. 'साल्यांनो! काय समजलात! पाणी देत नाही? मी हे जाळून टाकीन, थोबाडे फोडीन! आता प्रकरण वाढत जाणार म्हणून कॅंटिनचे मालक समजावण्यासाठी आले. ३–४ पोरंही मदान्यांच्या भोवती गोळा झाली. मदान्यांना वाटले, मालक पोरे घेऊन आपल्या अंगावर आलाय. त्यांचे रक्त अजून तापले. तेवढ्यात धुळे–सातारा–कऱ्हाडची मंडळी एकत्र झाली व त्यांनी मालकाला झापले. 'ह्याचा बदला मी घेईन' अशी गर्जना करीत भाई मदाने स्वतःच्या पैशाने चहा प्यायला बाहेर निघून गेले. जाताजाता एकाने टोमणा मारला 'अहो, मदाने इथे पाणी कमी असेल तर तुमच्या व्होल्गा नदीतून पाठवून द्या ना!' मदाने हे कॉमरेड आहेत हे त्यावरून समजले. रागारागात कॉमरेड भाई मदाने, आपल्या निळ्या गाडीतून निघून गेले!

ह्या पार्श्वभूमीवर सर्वसाधारण सभेस १० वाजता सुरुवात झाली. मोरारजीभाईंनी सोलापूरला जे उद्‌गार काढले त्याचा निषेध करणारे पत्रक परिषदेने काढले, त्याचे स्पष्टीकरण आले का? ह्या प्रश्नावरून बराच गोंधळ झाला. श्रद्धांजली वाहण्यासाठी नावे देण्याची सुरुवात झाली. अहो, त्या देशपांड्यांचे नाव घाला. अशी अनेक नावे सुचवली गेली. सर्वांच्या स्मरणार्थ, १ मिनिट शांतता. तांत्रिक मुद्दे उपस्थित करून बैठक संपली. फलनिष्पत्ती काही नाही.

पुन्हा जेवणाच्या वेळी धडपड. आज तर संख्या वाढली होती. त्यामुळे गोंधळात अजूनच भर पडली. सकाळचे जेवण 'गावकरी' तर्फे आहे हे समजले होतेच. अरविंद पोतनीस सर्वांना आग्रह करून फ्रुट सॅलेड कसे आहे हे विचारीत होते.

दुपारी साडेतीनला महिला पत्रकारांचा मेळावा आहे हे समजल्यावर जाणे भागच होते. जागा मिळणार नाही म्हणून आधीच जाऊन बसलो. आमच्याआधी सोबतचे बेहेरे काळा शर्ट, पांढरी पॅंट अशा छान वेषात गोल्ड फ्लेक पीत बसलेले होते. कोपऱ्यात कार्यकारणीची अनधिकृत बैठक चालली होती. भाई मदाने व इतर सर्वजण भोजनव्यवस्थेविषयी तक्रार करीत होते. आम्ही नाशिकच्या एकाही पदाधिकाऱ्याला समारंभात जाहीर माफी मागितल्याशिवाय बोलू देणार नाही अशी चक्क धमकीच सगळ्यांनी ब्रिजलाल पाटील ह्यांना दिली. महिला मेळाव्याची घोषणा झाली व बैठक उठून दुसरीकडे गेली.

महिला मेळावा म्हणजे नेमके काय? ह्याची कल्पना संयोजकांना नसावी असे वाटले. महिला पत्रकारांचा मेळावा (women journalist) का महिला पत्रकारिता (women's journalism) का नुसताच महिला मेळावा ह्या गोंधळात मेळावा सुरू झाला. संपूर्ण सभागृहात ४०–५० महिला होत्या. स्टेजवर 'बुलढाणा टाइम्स'च्या संपादिका कु. शोभना खर्चे, लोकसत्ता व लोकप्रभेच्या कार्यकारी

संपादिका वसुंधरा पेंडसे, अनुराधा औरंगाबादकर दिसत होत्या. प्रेक्षकांमध्येसुद्धा काही महिला पत्रकार बसल्या आहेत अशी माहिती सांगताच पुरुष पत्रकार माना ताठ करून पहात होते. स्त्रियांना पुरेसे प्रतिनिधित्व व संधी मिळाली पाहिजे म्हणून हा मेळावा आम्ही घेत आहोत असे अनुराधाबाई सांगतात. शिवाय मेळावा प्रशिक्षणाची शाळा आहे असे सुद्धा म्हणतात. समारंभाच्या अध्यक्षा शोभना खर्चे भाषण करायला उठतात. आपल्याला भाषणाची सवय नाही तेव्हा मीं जास्त बोलणार नाही असे म्हणून पत्रकारांना त्या चक्क 'साहित्यिक' बनवून टाकतात. बुलढाण्यासारख्या ठिकाणाहून त्या धीराने साप्ताहिक चालवतात ही कौतुकाची गोष्ट आहे. वाचक भगिनींना नेमके काय हवे यासाठी मग इतरांना बोलाविले जाते. अर्थात रीतीरिवाजाप्रमाणे शहरातील प्रतिष्ठितांच्या बायकांकडे बोलण्याचा मान जातो. सूर्यकिरणांना ज्याप्रमाणे मज्जाव नसतो त्याप्रमाणे पत्रकारांचे असते असे सौ. वत्सलाबाई पोतनीस सांगतात. त्यानंतर चक्क २० मिनिटे नगराध्यक्षांच्या पत्नी सौ. गुप्ते भाषण करतात. नेमके कोणत्या प्रश्नावर बोलावे, स्त्रियांचे प्रश्न काय ह्याचा कोणी उल्लेख करीत नाही. फक्त भुसावळच्या सौ. वाणी फार सुरेख मुद्दे मांडतात.

चेहऱ्यावरून सारखा रुमाल पुसणाऱ्या वसुंधरा पेंडसे शेवटी बोलायला उभ्या राहतात. वेगळ्या अधिवेशनाची आवश्यकता का? आजची समाजरचना, इतिहासातील महिला पत्रकारांची कामगिरी ह्यांचा उल्लेख करीत त्या आटोपतात. राम मनोहर त्रिपाठी हे मंत्री हजर असतातच. त्यांना बोलायचा आग्रह केला जातो. मी तुम्हाला आशीर्वाद काय देणार? माझे ते वय नाही.

सबका हृदय जीतलो आचरणसे
जैसे के मधुगंध वातावरणसे
आशीष का मूल्य होता बहुत है
देते नहीं लोग अंतःकरणसे

अशी कविता वाचून ते भाषण संपवतात. महिला मेळाव्याचा चक्क fiasco होतो. मला संयोजकांचे सुद्धा समजू शकत नाही की, ह्यामागचा त्यांचा नेमका उद्देश कोणता? शिवाय ज्या महिला पत्रकार अधिवेशनाला आल्या होत्या त्या आपण टुरिस्ट आहोत अशा थाटात होत्या. ग्रामीण तर जाऊ द्या; परंतु शहरी स्त्रियांचे प्रश्न तरी ह्यांना माहिती आहेत का नाहीत अशी शंका वाटण्यास जागा होती. अशा प्रकारचे कार्यक्रम अधिवेशनात होणार असतील तर --आनंद आहे ही सर्वांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती. सर्वांत वाईट गोष्ट महिला मेळाव्यानंतर आढळली. महिला पत्रकार हा चेष्टेचा विषय बनला.

संध्याकाळी अधिवेशनाचे उद्घाटन नभोवाणीमंत्री लालकृष्ण अडवानी ह्यांच्या हस्ते व मुख्यमंत्री वसंतदादांच्या उपस्थितीत असते. म्हणून धावपळ सुरू होते. स्टेज तर गच्च भरलेले असते. नारायण आठवले निवडून आल्यामुळे तर अडवाणीजींच्या बाजूलाच बसतात. सावरकरांच्या 'स्वतंत्रते भगवती' ह्या गीताने सुरुवात होते. अत्यंत बेसूर आवाजात व वाट्टेल तसे गाणे चालते. हे कमी झाले म्हणून की काय, 'प्रभो तुम अंतर्यामी दया करो स्वामी' हे भजन आळविले जाते. अडवाणी खाली मान करून बसतात. गाण्यांचा कार्यक्रम गुंडाळला जातो. स्वागताध्यक्ष चंदुलाल शहा उभे राहतात. मी गेल्या दोन दिवसांपासून पत्रकारबंधूंना जो त्रास सहन करावा लागला त्याबद्दल जाहीर दिलगिरी मागतो असे ते म्हणतात. शहांचा चेहरा रडवेला झालेला असतो. भाई मदाने वगैरे मंडळी विजयी मुद्रेत असतात. श्री. अडवाणी बोलायला सुरुवात करतात. आपल्या सुरेख हिंदीत फार महत्त्वाचे मुद्दे ते मांडतात. ह्या अधिवेशनात वेतनआयोगावर वृत्तपत्रमालकीच्या संदर्भात चर्चा झाली नसेल तर मला आश्चर्य वाटेल, Professional integrity विषयी ते फारच आग्रह धरतात. वृत्तपत्रांना तीन घटकांचा धोका आहे. प्रथम सरकार, दुसरा स्वामित्व आणि तिसरा Lack of integrity असे सांगून हिटलरचा एक किस्सा ते सांगतात. 'Dictator feels uneasy when people laugh' हे त्यांचे वाक्य १९ महिन्यांची याद देऊन जाते.

आता अडवाणीजींच्यानंतर वसंतदादांनी काय बोलावे? ते चक्क भाषण वाचून दाखवायला सुरुवात करतात. १० ठिकाणी अडखळतात. वाचताना चढउतारसुद्धा करीत नाहीत. लोक चक्क उठून जातात. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांतून वसंतदादांचा वृत्तपत्रांना इशारा असे मथळे वाचून हसूच येते. दादांच्या भाषणानंतर सूत्रसमर्पण समारंभ होतो. रात्री 'देशदूत'च्या तर्फे भरपूर श्रीखंडाचे जेवण होते. पुन्हा रात्रीचा गोंधळ सुरू होतो.

## दि. ११ जून

आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस. सकाळीच मंडळी मुक्तिधाम, पंचवटी, त्र्यंबकेश्वरला रवाना होतात. ७५ वर्षे पूर्ण झालेल्या पत्रकारांचा सत्कार श्री. यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते सकाळी होणार असतो; पण अचानक यशवंतराव आजारी पडल्याने, कुसुमाग्रजांना पकडून आणण्यासाठी धावपळ सुरू होते. दहाचा कार्यक्रम १२ ला सुरू होतो. अनेक वयस्कर पत्रकारांचा सत्कार केला जातो. बाबूराव ठाकुर, अप्पा पेंडसे, माया मराठे, असे किती तरी! कार्यक्रम लवकर संपतो. दिल्लीच्या 'स्टेटस्मन'-मधील सुधाकर जाधव तर एकूण अधिवेशनातील कार्यक्रमावर चिडलेले असतात. आमचे दिवस वाया गेले ही त्यांची प्रतिक्रिया. दुपारी लगेच झकासपैकी जिलब्यांचे जेवण होते. जेवणाशिवाय दुसरा उद्योगच नसतो!

संपूर्ण तीन दिवसांत कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा होत नाही. आणीबाणीतील काळ्या दिवसांची साधी आठवणसुद्धा कोणी काढीत नाही. ग्रामीण वृत्तपत्रांचे प्रश्न, वार्ताहरांना बातम्या पाठवण्यात येणारे अडथळे, विविध दबाव ह्या साध्या वृत्तपत्रीय समस्यांवरसुद्धा चर्चा होऊ नये, ह्याचे आश्चर्य वाटते. समस्यांवर चर्चा होणार नसेल तर अधिवेशने कशाला? ह्याचे साधे-सोपे आणि सरळ उत्तर मला मात्र तीन दिवसांत मिळाले. झकासपैकी आराम, उखाळ्या-पाखाळ्या, बासुंदी-श्रीखंड-जिलब्या ह्या सर्वांसाठी तरी अमरावतीच्या पुढील अधिवेशनाची सर्वजण वाट बघणार! पत्रकारितेचे काय हे धिंडवडे! लोकमान्य, आम्हाला माफ करा हो!

□

# राजधानी दिल्ली : मुखपृष्ठ २ वरून

राजीनामा द्यावा यासाठी त्यांनी पद्धतशीर मोहिम सुरू केली आहे. हृदयविकारामुळे रुग्णशय्येला खिळावे लागल्यामुळे चरणसिंगांना सध्या गप्प बसावे लागत आहे. या काळात एकटे राजनारायणच त्यांना वारंवार भेटत होते. त्यामुळे चंद्रशेखर यांची हकालपट्टी व्हावी असे चरणसिंगांनाच वाटत आहे आणि त्यांचा हा मनसुबा राजनारायण यांच्यामार्फत व्यक्त होत आहे, याबद्दल कोणालाही संदेह उरलेला नाही. गेल्या जूनमधील विधानसभांच्या निवडणुकीनंतर उत्तर भारतातील ज्या सात राज्यांत जनता पक्षाची सरकारे अधिकारावर आली, त्यांपैकी तीन राज्यात जनसंघाचे कार्यकर्ते मुख्यमंत्री झाले आणि उर्वरित चार राज्ये, चरणसिंगांच्या भारतीय लोकदलाच्या वर्चस्वाखाली गेली. तेव्हापासून या चार राज्यांपुरता निर्णय करण्याचा केवळ आपल्यालाच अधिकार आहे, इतरांनी तेथे हस्तक्षेप करता कामा नये, असे चरणसिंग मानू लागले. या चार राज्यांपैकी एक ओरिसाचा अपवाद वगळला तर हरयाना, उत्तरप्रदेश आणि बिहार येथल्या मुख्यमंत्र्यांविरुद्धचा त्या त्या विधिमंडळ जनता पक्षातील असंतोष मोडून काढणे चरणसिंगांना जमू शकलेले नाही. यामागे पूर्वाश्रमीचे संघटना काँग्रेसवादी आणि समाजवादी यांचा हात आहे अशी चरणसिंग तक्रार करतात. भालोदने जनसंघाशी समझोता केलेला असल्यामुळे आपण संघटना काँग्रेस आणि समाजवादी यांच्या नेत्यांना निष्प्रभ करू असा जो चरणसिंगांचा पहिला होरा होता तो प्रत्यक्षात येऊ शकला नाही. हरयानाचे मुख्यमंत्री देवीलाल यांच्याविरुद्ध हरयाना विधिमंडळ जनता पक्षात बंड होताच केंद्रीय संसदीय मंडळाने देवीलाल यांना बहुमताचा कौल घेण्याचा आदेश दिला आणि तेव्हापासून चरणसिंग यांच्या धुसफुशीला सुरुवात झाली. रुग्णालयातून त्यांनी कार्यकारिणीचा आणि संसदीय मंडळाचा राजीनामा धाडून दिला. इतकेच नव्हे तर दीड महिना होऊन गेलेला असला तरी तो परत घेतलेला नाही. कारण देवीलाल यांच्यानंतर उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री रामनरेश यादव यांच्यावरही तशीच पाळी आली. त्यामुळे राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक होईपर्यंत आपण राजीनामा मागे घ्यायचा नाही असे त्यांनी ठरविले आहे. पक्षातील ऐक्य कायम टिकविण्यासाठी कार्यकारिणीकडून यापुढे आपल्या जहागिरीत इतरांची ढवळाढवळ होणार नाही असे आश्वासन मिळाले तरच चरणसिंग राजीनामा परत घेतील. कदाचित आपला हट्ट ते सध्या तरी फार जोराने रेटणार नाहीत. कारण आपल्या थरेरावी वर्तनामुळे आपण जनसंघाला दुखावले आहे हे लक्षात घेऊन आताच पक्षफुटीपर्यंत पाळी आणण्यात शहाणपण नाही एवढे भान बाळगण्याइतके ते चलाख आहेत.

सुंदरसिंग भंडारी हे जनसंघीय नेते जाहीर वादावादीत सहसा पडत नाहीत; परंतु उत्तरप्रदेशच्या बाबतीत त्यांनी परवा चरणसिंग यांना रोखठोक शब्दात सुनावले आहे. भारतीय लोकदलाने रामनरेश यादव यांच्या संदर्भात जनसंघाचा पाठिंबा गृहीत धरून चालणार नाही, असे भंडारी यांनी म्हटले आहे. याचा अर्थ असा की, अकार्यक्षम कारभारामुळे रामनरेश यादव यांनी मुख्यमंत्रिपद सोडावे अशी मागणी पुढे आली तर जनसंघ तिच्या विरोधात उभा राहील असा चरणसिंग यांनी समज करू नये हेच भंडारी यांना सुचवायचे होते. भंडारी यांच्या या उद्गाराबद्दल राजनारायण आणि स्वतः रामनरेश यादव यांनी नापसंती व्यक्त केली असली तरी त्या संबंधीची प्रतिक्रिया व्यक्त करताना त्यांनी नेहमीच आदळआपट केलेली नाही. चंद्रशेखर यांच्यावरचा हल्ला हा अप्रत्यक्षपणे मोरारजी देसाई यांच्या दिशेनेच करण्यात येत आहे ही भंडारी यांना जाणवल्यानंतरच त्यांनी भारतीय लोकदलाला भ्रमात न राहण्याबाबत सांगितले. केंद्रीय मंत्रिमंडळात पेचप्रसंग निर्माण करण्याची कोणतीही कारवाई जनसंघ सहन करणार नसल्यामुळे भालोद-जनसंघ सहकार्याचा भलता अर्थ करण्यापासून चरणसिंगांनी परावृत्त व्हावे हेच भंडारी यांनी सुचविले आहे.

चंद्रशेखर यांची अध्यक्षपदाची मुदत १ मे रोजी संपलेली असल्यामुळे त्यांनी राजीनामा द्यायला हवा आणि त्या जागी नव्या अध्यक्षाची निवड केली जावी असा राजनारायण यांचा आग्रह आहे. पक्षांतर्गत निवडणुका पुढे ढकलल्या जायला जणू एकटे चंद्रशेखरच कारणीभूत आहेत असे दाखवून राजनारायण त्यांना बोल लावत आहेत; परंतु जनता पक्षातील विविध घटकपक्षांना एकात्म करण्याबाबत कोणीच पुढाकार घेतलेला नाही अजूनही संघटना काँग्रेस, जनसंघ, समाजवादी आणि लोकशाहीवादी काँग्रेस यांच्याप्रमाणे भारतीय लोकदलाने आपले वेगळेपण जपलेले असताना, पक्षनिवडणुकीतील विलंबाची सबब पुढे करून राजनारायण जेव्हा चंद्रशेखर यांना एकट्याला झोडपू पाहतात तेव्हा त्यांना जनता पक्षाच्या भवितव्यापेक्षा भारतीय लोकदलाचे महत्त्व आणि वर्चस्वच अधिक अभिप्रेत आहे हे दिसून येते. पक्षांतर्गत निवडणुकीपूर्वी ठरल्याप्रमाणे मेपूर्वी होऊन गेल्या असत्या तर राजनारायण यांच्यासारख्यांना दोषारोप करायला अवसर मिळाला नसता. सुबद्ध पक्षसंघटना निर्माण करण्याच्या बाबतीत सर्वच घटकपक्ष उदासीन आहेत आणि त्यामुळे निवडणूक लांबणीवर पडत आहे ही वस्तुस्थिती राजनारायण यांच्या आक्षेपकांना नाकारता येणार नाही; परंतु त्याबाबत राजनारायण यांनी एकट्या चंद्रशेखर यांच्यावर भडिमार करावा हेही उचित नाही. आपण सगळेजणच या विलंबाला जबाबदार आहोत अशी समजूतदार भूमिका त्यांनी घेतली असती तर सध्या जे जाहीर वादावादीचे स्वरूप आले आहे ते टळले असते.

चरणसिंग–राजनारायण गटाच्या कारवायांवर ज्यांची बारकाईने नजर आहे त्यांच्यामध्ये रामधन आणि कृष्णकांत यांचा समावेश आहे. रामनरेश यादव यांनी आपले बहुमत सिद्ध केले असले तरी त्यांच्या गैरकारभाराविरुद्ध सुरू झालेला लढा चालूच राहील असे रामधन यांनी चरणसिंगांना बजावले आहे तर चंद्रशेखर यांचे निमित्त करून राजनारायण यांनी जी सरबत्ती चालविली आहे ती मोरारजी देसाई यांनी पंतप्रधानपद सोडावे या हेतूनेच होय असे कृष्णकांत यांनी म्हटले आहे. चरणसिंग पंतप्रधान आणि राजनारायण पक्षाध्यक्ष

झाले तर भारतीय लोकदलाला हर्षवायु होईल हे खरे आहे; परंतु सध्याच्या परिस्थितीत तसे होण्याचा किंचितही संभव नाही हे या दलाला माहीत असल्यामुळे त्याने आपले उपद्रवमूल्य वाढवून घेण्याचा खटाटोप आरंभिला आहे.

हा खटाटोप सहन केला तर पक्षांतर्गत निवडणुकीच्या वेळी बरेच वादंग माजण्याचा संभव आहे हे ओळखून, मोरारजीभाईंनी पत्र-प्रतिनिधींशी बोलताना, पक्ष निवडणुका होईपर्यंत चंद्रशेखर हेच अध्यक्ष राहतील, त्याचप्रमाणे राष्ट्रीय कार्यकारिणीची फेररचना करण्याचेही कारण नाही असे आपले मत असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की, हे माझे वैयक्तिक मत आहे त्यासंबंधीचा अंतिम निर्णय सहा सदस्यांच्या संसदीय मंडळाने करावयाचा आहे. संसदीय मंडळाच्या मध्यंतरी भरलेल्या बैठकींना आजारपणामुळे चरणसिंग हजर राहू शकले नव्हते. आगामी बैठकीला ते हजर राहिले तर राजनारायण-प्रकरणाबाबतची त्यांची भूमिका इतर सदस्यांना समजू शकेल. कारण राजनारायण यांनी पक्षशिस्त गुंडाळून ठेवून अध्यक्ष आणि कार्यकारिणी यांच्यासंबंधी जे बेजबाबदार मतप्रतिपादन जारी ठेवले आहे त्याकडे दुर्लक्ष करणे संसदीय मंडळाच्या इतर सभासदांना परवडण्यासारखे नाही. म्हणून आपल्याविरुद्ध चालू झालेल्या टीकेमध्ये राजनारायण यांचा पुढाकार किती आणि चरणसिंग यांची मूकसंमती किती हे जाणून घेण्यासाठी मोरारजीभाई मायदेशी परतायच्या आदल्या दिवशी स्वतः चंद्रशेखर यांनी सुरजकुंड येथे जाऊन चरणसिंगांची भेट घेतली. या भेटीत आपण केवळ चौधरीसाहेबांच्या प्रकृतीची चौकशी केली, जनता पक्षातील भांडणांसंबंधी बोललो नाही, असे चंद्रशेखर यांनी म्हटले आहे. चंद्रशेखर आणि चरणसिंग यांची भेट होऊ नये अशी राजनारायण यांची इच्छा होती आणि म्हणून या भेटीत विक्षेप येण्याच्या दृष्टीने ते शेवटपर्यंत प्रयत्न करीत होते; परंतु चंद्रशेखर यांनी सुरजकुंड येथे जायचे ठरविल्यानंतर राजनारायण यांचा नाईलाज झाला.

चरणसिंगांची भेट घेऊन दिल्लीला परतल्यावर चंद्रशेखर यांनी असे म्हटले की, जनता पक्षातील पाच घटक वेगवेगळ्या बैठकी घेऊन एकात्मतेमध्ये अडसर आणीत आहेत हे खरे असले तरी त्यांच्यापैकी कोणासही जनता पक्षातून फुटून निघण्याची हिंमत होणार नाही. चंद्रशेखर यांचा हा आशावाद चरणसिंगांशी झालेल्या बोलण्यावर आधारलेला आहे किंवा नाही, हे कळायला मार्ग नाही. कदाचित जनता पक्षातून फुटून निघण्याचा भारतीय लोकदलाचा मुळीच विचार नाही असे चरणसिंगांनी आश्वासन दिलेले असेल. सर्व काँग्रेसजनांनी एकत्र येऊन जनता पक्षाला पर्यायी पक्ष स्थापन करावा असा प्रयत्न काही काँग्रेसनेते करीत असल्याचे जनता पक्षाचे खजिनदार चंद्रभानु गुप्ता यांनीच म्हटले आहे. चरणसिंगांनी आपला हटवादी पवित्रा मागे घ्यायला चंद्रभानु गुप्ता यांच्या भेटीगाठीही कारणीभूत ठरल्या असतील. कारण चंद्रभानु गुप्ता यांनी काँग्रेसजनांच्या एकीकरणाला आपला पाठिंबा आहे एवढेच केवळ जाहीर केलेले नाही, तर ते त्यासंबंधात कृष्णचंद्र पंत, नारायणदत्त तिवारी आणि मोहसिना किडवाई यांना भेटले आहेत. चंद्रभानु गुप्ता यांच्या पुढाकारामुळे उत्तरप्रदेशात ही युती अस्तित्वात आली तर तेथील राजकारणावरील चरणसिंगांची पकड उद्ध्वस्त होईल. चंद्रभानु गुप्ता आणि चरणसिंग आज जरी एका पक्षात असले तरी उत्तरप्रदेशाच्या राजकारणापुरते ते दोघे परस्परांचे कट्टर प्रतिस्पर्धी आहेत. चंद्रभानु गुप्ता यांचे मुख्यमंत्रिपद चरणसिंगांमुळे गेले होते तर गुप्तांच्या कारवायांमुळे चरणसिंगांना त्या पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. जनता पक्षाने केंद्रामध्ये सत्ताग्रहण केल्यानंतर चरणसिंग केंद्रीय राजकारणात एक प्रभावी म्हणून प्रविष्ट झाले तर चंद्रभानु गुप्ता यांच्या अस्तित्वाला नाममात्रच अर्थ उरला. जनता पक्षाच्या एकतेवर आघात होईल या टोकापर्यंत चरणसिंग गेले तर काँग्रेसजनांची एकी करून चंद्रभानु गुप्ता त्यांना शह देऊ शकतील. अर्थात काँग्रेसजनांच्या एकतेसंबंधीचा मोरारजीभाईंचा निर्णय आपण मान्य करू असेही गुप्ता यांनी जाहीर केले आहे. मोरारजी देसाई यांच्याविरुद्ध कितपत जायचे हे ठरविताना चरणसिंगांना गुप्ता यांच्या हालचालींची उपेक्षा करून चालणार नाही. म्हणून चंद्रशेखर यांनी म्हटल्याप्रमाणे, स्वतंत्र होऊन आपला बोजवारा उडवून घेण्यापेक्षा घटकपक्षांना जनताच्या ध्वजाखाली एकत्र राहणेच श्रेयस्कर वाटेल. थोडक्यात काय तर राजनारायण यांचा मुखभंग करण्याइतकी हिंमत संसदीय मंडळाने दाखवली नाही तर 'पार्टी ना बनेगी, ना टूटेगी' अशी या पक्षाची अधांतरी अवस्था यापुढेही कायम राहील.

□